MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक ४ / एप्रिल २०१५

## संपादकीय

## संशोधनपत्रिकेची सुरुवात आणि लंडनची रॉयल सोसायटी

एकशेवीस (१२०) कोटींहून अधिक लोकसंख्या असलेला भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. शिवाय भारताला ५००० वर्षांचा इतिहास आहे. दुर्दैवाने इतिहासाची वर्षे वाढली; तरी समाजाची 'प्रगती' आणि 'उत्कर्ष' हा गणितीश्रेणीने वाढतच जातो असे भारताची वर्तमान परिस्थिती बघून वाटत नाही. अस्वच्छता, भष्टाचार, लांगूलचालन, सुलभ व्यवसायनीती, आर्थिक नि राजकीय पारदर्शकता आणि शिक्षण या सर्वच आघाड्यांवर भारत हा आंतरराष्ट्रीय मापदंडाप्रमाणे अत्यंत खालच्या श्रेणीवर उभा आहे. आकडेशास्त्राचे आधार घेत 'आर्थिक' आणि 'औद्योगिक' क्षेत्रात भारत हा फार मोठी प्रगती करून एक मोठी महासत्ता होणार आहे हे राजकीय विश्लेषक दाखवत असलेले चित्र फसवेच नाही तर वास्तवाचे आणि जनतेची दिशाभूल करणारे आहे. प्रगती किंवा विकास हा बाजारात विकत घेता येत नाही.

समाज हा व्यक्तींनी बनलेला असतो. व्यक्ती आणि सामाजिक विवेकाची निर्मिती ही शालेय आणि सामाजिक शिक्षणातून अनेक शतकांतून करावी लागते. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक ही सगळीच सांस्कृतिक अंगे समाजाच्या प्रगतीकरता आवश्यक आहेत. निर्णयक्षमतेतील तारतम्य जेव्हा सुटते तेव्हा अधोगतीला सुरुवात होते. आजच्या भारतातील या सर्वच क्षेत्रांमध्ये नेतृत्वाची दिवाळखोरी हे याचेच पुराव्यादाखल उदाहरण म्हणता येईल. लोकशाही प्रक्रियेने आपणच निवडून दिलेले लोकप्रतिनिधी जेव्हा 'तंबाखूने कर्करोग होत नाही' असे विधान करतात; तेव्हा 'तर्क' आणि 'विवेक' या दोघांनीही नीचांक गाठलेला असतो. याच पार्श्वभूमीवर गेल्या काही शतकातील पाश्चात्य देशांच्या वैज्ञानिक आणि आर्थिक प्रगतीच्या संदर्भांचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

चौदाव्या शतकात युरोपमध्ये 'प्रबोधनाचे युग' (Renaissance) चालू झाले. 'कला', 'धर्म' आणि 'विज्ञान' या सर्वच आघाड्यांवर वैचारिक परिवर्तनाचे वारे याच काळात वाहायला सुरुवात झाली. सहाजिकच यामुळे धर्मसत्तेशी संघर्ष होणे अपरिहार्य होते. १५ व्या/१६व्या शतकामधील कोपर्निकस, गॅलिलिओ आणि ब्रूनो यांच्या निरीक्षणांना झालेला धर्मसत्तेचा विरोध हे याचे बोलके उदाहरण होते. सतरावे शतक हे या आधीच्या घटनांची ताकद घेऊनच जन्माला

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आले. खऱ्या अर्थाने 'आधुनिक' युगाच्या पहाटेचा तो आरंभ होता. पुढच्या वैज्ञानिक प्रगतीचा पाया ठरणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना फ्रान्स, आणि इंग्लंडमध्ये या वेळी घडल्या. त्या म्हणजे वैज्ञानिक संवाद आणि निरीक्षणांची, विवेक आणि तर्कावर आधारीत मांडणी करून; ती व्यापक चर्चेकरता छापून उपलब्ध करून देणे. संशोधनपत्रिकांच्या (Research Journals) निर्मितीची ती सुरुवात होती. २०१५ साली या घटनांना ३५० वर्षे पुरी होत आहेत.

५ जानेवारी १६६५ ला फ्रान्समध्ये Journal des Scavans आणि ६ मार्च १६६५ ला लंडनमध्ये Philosophical Transaction या विज्ञानसंशोधनपत्रिकांचा पहिला अंक छापला गेला. विचारांचे आदानप्रदान आणि संवादाच्या एका नव्या युगाची ती सुरुवात होती. इंग्लंड आणि जगातल्या सर्वच प्रगत देशांमधील, विद्यापीठे, संग्रहालये आणि ग्रंथालये या सर्वांमध्येच भाषणे नि चर्चासत्रे याकरता आयोजित केली जात आहेत. यात सर्वात महत्त्वाचा अभ्यास हा तत्कालीन 'सामाजिक परिस्थितीचा' होणार आहे. साडेतीनशे वर्षांच्या या प्रवासाचा अभ्यास म्हणूनच महत्त्वाचा आहे. हा इतिहास म्हणजे नुसत्या विज्ञानाचा इतिहास नसून समाज, धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती या सगळ्यांचेच त्यामध्ये प्रतिबिंब आहे. संशोधनपद्धतीमध्ये झालेल्या बदलांचाही तो एक इतिहास आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हा सगळा इतिहास ग्रंथित आहे. गेल्या ३५० वर्षांत यावर विपुल लिखाणही झाले आहे. 'सर्जनशीलता' आणि 'विवेकी' समाज या परस्परावलंबी गोष्टी असून; त्यांच्यातूनच प्रगल्भ धर्मसंकल्पना आणि विज्ञान निर्माण होते. अपघाताने नाही तर मशागतीने असा समाज निर्माण होत असतो. प्राचीन भारताचा इतिहास याची साक्ष आहे.

इंग्लंडमध्ये त्याचसुमाराला आणखी एक महत्त्वाची घटना घडली. १२व्या/१३व्या शतकात केंब्रिज आणि ऑक्सफर्डमध्ये प्रसिद्ध विद्यापीठे चालू झाली. येथून, संतुलीत उहापोहावर आधारित अभ्यास करणारे अनेक वैज्ञानिक निर्माण होत होते. अशाच काही अभ्यासकांचा एक गट; ऑक्सफर्डच्या वधाम कॉलेज (Wadham College) चे एक अभ्यासक विल्कीन्स (Wilkins) यांच्या नेतृत्वाखाली एकत्र जमून आपापल्या संशोधनाचे आदान-प्रदान करू लागला. यामध्ये प्रसिद्ध स्थापत्यकार ख्रिस्तोफर रेन (Christopher Wren) आणि रॉबर्ट हूक (Robert Hooke) यांचाही समावेश होता. ख्रिस्तोफर रेन पुढे लंडनला स्थायिक झाले. लंडनच्या ग्रेशम (Gresham) महाविद्यालयामध्ये ते ग्रहगणिताचे प्राध्यापक होते. २८ नोव्हेंबर १६६० ला ख्रिस्तोफर रेन, रॉबर्ट बॉइल, जॉन विल्किन्स आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी मिळून याच ग्रेशम कॉलेजमध्ये 'रॉयल सोसायटी'ची स्थापना केली. न्यूटनपासून जगातील अनेक वैज्ञानिकांनी ति अध्यक्षपद भूषविले आहे. सर्वांत आनंदाची गोष्ट म्हणजे, या वर्षीचे अध्यक्षपद हे भारतीय वंशाचे नोबेल पारितोषिक विजेते श्री. वेंकटरामन रामकृष्णन हे भूषवीत आहेत.

रॉयल सोसायटीच्या स्थापनेमागील मुख्य हेतु हा वैज्ञानिकांची निरीक्षणे एकमेकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांवर टिप्पणी करणे हाच होता. हे संशोधक दर आठवड्याला ग्रेशम कॉलेजमध्ये भेटून अनेक विषयांवर चर्चा करीत असत. रॉबर्ट बॉइल हे या गटाचे पहिले प्रबंधक झाले. अशा चर्चांकरता संदर्भग्रंथालये लागतात; म्हणून लगेचच अनेक विषयांवर छापल्या गेलेल्या पुस्तकांचा संग्रह करायलाही सुरुवात झाली. अशा कार्याकरता राजाश्रय हा आवश्यक असतो.

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक ४ / एप्रिल २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | शी शीया स्मशानभूमी (Xi xia Mausoleum) | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | विकासवेध-४ : विकासपीडिया | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १५) | श्री. अरविंद ओक | ९ |
| ५) | समिधाच सख्या या | डॉ. सौ. अनघा गोखले | १२ |
| ६) | '(कमी) बोलण्याची कला' | ज्योती सीताराम शिंदे | १५ |
| ७) | चारुकर्णे शिरीष : भारतीय पुष्पश्रृंगार | श्री. प्रशांत धर्माधिकारी | १६ |
| ८) | कंबोडिया, एक भयानक सत्य ! | श्री. संदीप कुलकर्णी | १९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# शी शिया स्मशानभूमी (Xi xia Mausoleum)

*चीनमधील यिंचुआन या शहरातील शी शिया स्मशानभूमीची माहिती देणारा लेख - संपादक*

यिंचुआन शहराजवळ पाहण्यासारखी अनेक स्थळे आहेत. त्यातील एक स्थळ म्हणजे शी-शीया स्मशानभूमी होय. यिंचुआन शहरापासून सुमारे ३० किलोमीटरवर डोंगराच्या पायथ्याशी हे ठिकाण आहे. विज्ञान प्रदर्शन सुरू होण्याच्या आदल्या दिवशीच या स्थळाला भेट देण्याची आम्हांला संधी मिळाली. प्रदर्शन सुरू होण्याच्या एक दिवस आधी आपला प्रकल्प सज्ज करायचा असतो. त्यानुसार सकाळीच आम्ही हॉटेलमधून प्रदर्शनाच्या ठिकाणी पोहोचलो. सकाळचा वेळ प्रयोग लावण्यात आणि जवळच असलेल्या विज्ञान केंद्राला भेट देण्यात गेला. त्यानंतर आम्ही दुपारचे जेवण घेण्यासाठी हॉटेलला आलो. जेवणानंतर सर्वांनी दुपारी २.२० वाजता खाली दालनात जमावे असे आम्हांला सांगण्यात आले. नेमका कार्यक्रम काय आहे याची कल्पना नसल्याने आम्हां सर्वांना उत्सुकता होतीच. त्यामुळे वेळेच्या अधीच आम्ही दालनात हजर होतो. स्वयंसेवकांच्या प्रमुखाने आम्हांला बसमध्ये बसण्याची सूचना केली. त्यानुसार आम्ही सोयीची जागा पकडून बसमध्ये स्थानापन्न झालो. तेथे एक मध्यमवयीन स्त्री आधीपासूनच बसली होती. आम्ही सर्व जण आपापल्या जागी स्थिरावल्यानंतर त्या स्त्रीने बोलायला सुरु वात केली. तिने आपली ओळख मार्गदर्शिका (Guide) अशी करून दिली. तिच्या इंग्रजीवर चिनी भाषेचा प्रभाव स्पष्टपणे दिसत होता. परंतु तिचे इंग्रजी कळायला आम्हांला काहीच अडचण आली नाही. सर्वांचे चीनच्या निंक्शिया प्रांतात स्वागत करून तिने दुपारच्या कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली. आपण एक दफनभूमीला भेट देणार आहोत असे तिच्याकडून कळल्यावर तर आमच्या सर्वांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्हच उभे राहिले. ‘‘दफनभूमीत’’ पाहण्यासारखे काय असेल?



**प्रवेशद्वाराजवळ असलेले सुंदर अश्मशिल्प**

साधारणपणे अर्ध्या तासाच्या प्रवासानंतर आमची बस एका प्रशस्त प्रवेशद्वारातून आत शिरली. तेथे आधीच अनेक बसेस उभ्या होत्या. तरीही पार्किं गला पुरेशी जागा शिल्लक होतीच. सोयीच्या ठिकाणी बस उभी करून चालकाने आम्हांला उतरण्याची सूचना केली. खाली उतरून पाहतो तर काय, आपण एखाद्या बागेतच आहोत असे आम्हांला वाटले. जुन्या पद्धतीच्या अनेक इमारती सभोवताली दिसतात. त्यांतील काही इमारतींमध्ये लहानलहान दुकाने थाटलेली आहेत. त्यांकडे लक्ष न देता आमच्या मार्गदर्शिकिने आणखी एका प्रवेशद्वाराकडे नेले. तेथे प्रवेशाचे तिकीट घेऊन आत रांग लावावी लागते. कारण तेथून विजेच्या घटावर चालणाऱ्या वाहनांनी पुढे जावे लागते. प्रेक्षणीय स्थळाचा हा परिसर वाहनातून निघणाऱ्या धुराने प्रदूषित होऊ नये यासाठी ही काळजी घेतात. विजेवर चालणारे वाहन भरले की आपला प्रवास सुरू होतो. दोन्ही बाजूला गर्द झाडी आणि मध्ये मध्ये

पुतळे असे दृश्य आपल्याला दिसते. साधारणपणे १० मिनिटांच्या प्रवासानंतर आपण एका संग्रहालयापाशी येतो. मार्गदर्शिकिच्या सांगण्यावरून आमचा पहिला कार्यक्रम हा या संग्रहालयाला भेट देण्याचा होता. त्यानुसार आम्ही संग्रहालयात प्रवेश केला.







**चीन देश आणि निंक्शिया प्रांताचा नकाशा**

संग्रहालय तसे छोटेच आहे. परंतु त्यातील वस्तू अतिशय पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत. प्रत्येक वस्तूजवळ त्याची थोडक्यात चीनी आणि इंग्रजी भाषेत माहिती लिहिलेली आहे. निंक्शिया राज्याबद्दलची माहिती येथे आढळते. त्याचबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या उत्खननात सापडलेल्या वस्तू येथे ठेवलेल्या आहेत. हे संग्रहालय अलीकडे उभारले आहे. मूळची ही सर्व जागा राजघराण्यातील लोकांना पुरण्यासाठी राखून ठेवण्यात आली होती. अलीकडे प्राच्य विद्येचा अभ्यास करणाऱ्या गटाने या परिसरात उत्खनन करून माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. या उत्खननात सापडलेल्या वस्तूदेखील या संग्रहालयात ठेवलेल्या आहेत. या संग्रहालयात फेरफटका मारताना चीनच्या या परिसराची चांगलीच माहिती आपल्याला मिळते. संग्रहालय पाहण्यासाठी जेवढा वेळ आम्हांला दिला तेवढा वेळ झाल्यावर आम्ही बाहेर पडलो.





**उत्खननात सापडलेल्या वस्तू आणि नाणी**

''उत्खननात सापडलेल्या वस्तू आपण पाहिल्या, प्रत्यक्षात थडगी असतात कशी हे पाहायला आपण जाऊ या'' असे मार्गदर्शिकिने आम्हांला सुचविले. थोड्या मोकळ्या जागेत आल्यावर दूरच्या वाळूच्या ढिगाकडे बोट दाखवून ज्यांना शक्य असेल त्यांनी तिथपर्यंत जाऊन यावे अशी सूचना तिने केली. पडत्या फळाची आज्ञा मानून आम्ही लगबगीने रेतीच्या उंचवट्याकडे जाऊ लागलो जसजसे आम्ही जवळ पोहोचलो तसतसा रेतीचा उंचवटा

---

प्रार्थना म्हणजे आत्म्याची भूक शरीराला जेव्हढी आवश्यक आहे तेवढीच आत्म्याला प्रार्थना आवश्यक आहे.

स्पष्ट दिसत गेला. हे उंचवटे विटांनी बांधलेले होते. अनेक वर्षे ऊनपाऊस खाल्ल्याने त्या विटांची माती झाली. त्यावर रेती साचून ते रेतीचेच उंचवटे असावेत असा भास होतो. आजूबाजूला नजर टाकताच येथे अनेक असे उंचवटे असावेत असे लक्षात येते. त्यांतील एकदोनच आता शिल्लक आहेत. प्रत्येक थडग्याजवळ थोडी माहिती लिहिलेली आहे. १२ व्या आणि १३ व्या शतकात या परिसरात शिया राजांची राजवट होती. त्या राजघराण्यातील लोकांना पुरण्यासाठी म्हणून या परिसराची निवड केली. राजाच्या मृत्यूच्या आधीच थडग्याचे काम सुरू केले जात असे. अशा पद्धतीने या परिसरात अनेक थडगी बांधली गेली आहेत. या थडग्यांना संरक्षण देण्यासाठी सभोवती तटबंदी बांधलेली आहे. तिही अवशेष आपल्याला पाहायला मिळतात. १५व्या शतकाच्या सुरुवातीला मंगोलियातून आलेल्या चेंगीजखानने शिया राजाचा पराभव केला. त्यानंतर त्यांच्या राजवटीला अवकळा आली. तरीही त्यांची थडगी मात्र इतिहासाची साक्ष देत मागील शेकडो वर्षे येथे उभी आहेत.





**थडग्यांचे दुरून आणि जवळून दिसणारे दृश्य**

थडगीदर्शन झाल्यावर आम्ही अश्मशिल्पूंच्या बागेत शिरलो. येथे दगडात कोरलेल्या अनेक मूर्ती आहेत. त्याचबरोबर चिनी भाषेत मजकूरदेखील आहे. बागेतून पुढे पुढे जात आम्ही एका मंदिरापाशी पोहचलो. येथे दोन्ही बाजूला मातीचे पुतळे तयार करून त्या काळातील दृश्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. पुतळे बनविण्याऱ्या कलाकाराने चेहऱ्यावरचे हावभाव अतिशय उत्तम रितीने रेखाटले आहेत. येथे सैनिकांचे दैनंदिन जीवन, शेतकऱ्याचे दैनंदिन जीवन असे अनेक विषय हाताळले आहेत. प्रकाशयोजना उत्तम केलेली आहे. त्यामुळे पुतळ्यांचा आकार, त्यांचे चेहरे अगदी स्पष्ट दिसतात. बाहेरच्या भागात घोड्यांनी ओढायचा एक टांगा आहे. एकूणच परिसर फळाफुलांनी समृद्ध आहे. आजूबाजूला वेगवेगळी झाडे लावून परिसर सुशोभित केलेला आहे. त्यामुळे या परिसरात फिरताना आपल्याला प्रसन्न वाटते. या आनंदात आम्ही किती फिरलो याचा आम्हांला अंदाजच आला नाही. दुखणाऱ्या पायांनी मात्र त्याची जाणीव करून दिली. त्याहीपेक्षा मावळत्या सूर्याने परत निघण्याची सूचना केली. विजेवर चाणाऱ्या वाहनाने आम्ही बसजवळ आलो. त्यानंतर आमचा परतीचा प्रवास सुरू झाला.



**टांग्याला जुंपलेल्या घोड्यांचे पुतळे**

- **डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, वैभवनगरी, काटई,
शीळरोड, जि. ठाणे

●●●

बुद्धी ऐरण आहे आणि ज्ञान घण आहे जितके जीवनाचे अनुभव बुद्धीवर पडतात तितकी ती चमकते.

# विकासवेध-४ : विकासपीडिया

*भारत सरकारच्या 'विकासपीडिया' ह्या संकेतस्थळाची ओळख करुन देणारा लेख - संपादक*

कुठल्याही समाजातील विकासकामांचे मुख्य प्रवर्तक, हे तेथील सरकार असते. म्हणूनच विकासाचा वेध घ्यायचा असेल तर सरकारी योजनांचा वेध घेणे सयुक्तिक ठरते. त्यातही, सरकार जेव्हा आपल्या नागरिकांकरता अशा विकासाची माहिती स्वतःच एखाद्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देत असेल, तर अशा संकेतस्थळाची माहिती प्राप्त करून घेणे हे आपले आद्य कर्तव्यच ठरते. म्हणूनच भारत सरकारच्या 'विकासपीडिया' ह्या संकेतस्थळाची साररूप ओळख आज इथे करून देत आहे. विकिपिडिया म्हणजे वापरणाऱ्या लोकांनी स्वतःकरताच निर्माण केलेला ज्ञानकोश. हवाई भाषेत विकी म्हणजे मराठीत सत्वर, त्वरित, ताबडतोब किंवा लगेचच. लगेचच उत्तर मिळवून देणारा ज्ञानकोश ह्या स्वरूपात, विश्वव्यापी महाजालावर (वर्ल्ड वाइड वेब) विकिपिडियाची स्थापना २००१ साली करण्यात आली होती. ह्याचा उपयोग मग सगळ्यांनाच होऊ लागला. आज आपण सगळेच कधी ना कधी विकिपिडियाची मदत घेत असतो. त्याच धर्तीवर भारतातील विकासकामांची ओळख सगळ्यांना करून देणारा ज्ञानकोश, ह्या स्वरूपात विकासपीडियाची स्थापना २०१३ साली करण्यात आली.

विकासपीडिया[१] हे ज्ञानविषयक संकेतस्थळ आहे. हे संकेतस्थळ, भारत-विकास-पथद्वार[२] (इंडिया डेव्हलपमेंट गेटवे) ह्या राष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग आहे. ते माहिती व प्रसारण तंत्रज्ञानामार्फत, देशाच्या सामाजिक विकासातील प्रगतीच्या विशिष्ट गरजांकडे लक्ष पुरविते. हे संकेतस्थळ, भारत सरकारच्या विजकविद्या व माहिती तंत्रज्ञान विभाग, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचा[३] एक उपक्रम आहे. ते हैदराबाद येथील प्रगत संगणन विकासकेंद्रा[४] तर्फे चालविले जाते.

हे संकेतस्थळ वर्तमान परिस्थितीत आसामी, बंगाली, इंग्लिश, गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम, मराठी, तामीळ आणि तेलुगू ह्या दहा भाषांत पूर्णांशाने उपलब्ध आहे. एक खिडकी योजनेप्रमाणे, माहितीसेवा व उत्पादने ह्यांची माहिती, वंचित व विशेषतः गरीब लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम ते करते.

इथे, सरकार, नागरी समाजगट/ स्वयंसेवी संस्था आणि खाजगी संस्था इत्यादींचे दुवे प्रदान करून, गरीब लोक व विकासयोजना यांमधील अंतर कमी केले जाते. सेवाभिमुख, लोकाभिमुख, सुलभ असे माहिती तंत्रज्ञान, हेच ह्या संकेतस्थळाचे अंतिम ध्येय आहे. सामाईक सेवा केंद्रा[५] सारख्या निरनिराळ्या प्रकल्पांमार्फत, माहिती संवाद तंत्रज्ञाना[६] च्या माध्यमातून विविध संस्था, ग्रामीण स्तरावर आमूलाग्र बदल घडवून आणत आहेत. ह्याबाबतची सर्व आवश्यक माहिती, त्यांच्याच भाषेत, लोकांपर्यंत पोहोचवण्यास विकासपीडिया मदत करते.

प्रगत संगणन विकास केंद्राची स्थापना मार्च १९८८ मध्ये; भारत सरकारच्या संवाद व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (आधीचा विजकविद्या विभाग) वैज्ञानिक समाजाचा भाग म्हणून करण्यात आली. ही संस्था

प्रामुख्याने एक संशोधन संस्था आहे. ह्या संस्थेचे प्रमुख कार्य म्हणजे विविध माहिती तंत्रज्ञान संबंधित उत्पादनांची निर्मिती करणे आणि परम ह्या महासंगणकाच्या विविध आवृत्ती निर्माण करणे हे आहे. प्रगत संगणन विकास केंद्र, हैदराबाद; वि-सुरक्षा (इ-सेफ्टी, विद्युत-सुरक्षा), वि-शिक्षण (इ-लर्निंग, विद्युत शिक्षण), पुरवठा साखळी व्यवस्थापन (सप्लाय चेन मॅनेजमेंट), मुक्त स्रोत आज्ञावली (ओपन सोर्स सॉफ्टवेअर), फार मोठ्या प्रमाणातील समाकलक व अंगभूत प्रणाली अभिकल्पन (व्हीएलसीआय व एम्बेडेड सिस्टिम्स डिझाइन); ह्या विभागांवर संशोधन करत आहे.

विकासपीडिया ह्या संकेतस्थळावर; ग्रामीण दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या शेती, आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण, ऊर्जा आणि वि-शासन (इ-गव्हर्नन्स, विद्युत शासन म्हणजेच वि-शासन) ह्या सहा विषयांसंबंधीची माहिती आणि तत्संबंधित सेवासुविधांचा संच; दहा भारतीय भाषांत उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

१. शेती ह्या विभागामध्ये शेतीविषयक पतपुरवठा, धोरणे व योजना, उत्पादन-तंत्रज्ञान, पशुपालन व मस्त्यपालन, हवामान, बाजारपेठांची माहिती, सर्वोत्तम कार्यपद्धती, शेती आधारित व्यवसाय तसेच इतर व्यवसायांची आणि शेतीविषयक संस्थांची माहिती दिली आहे.

२. आरोग्य विभागातील माहितीचा भर, महिला व बालकांच्या आरोग्यावर असून ह्यामध्ये मलनिस्सारण व स्वच्छता, सर्वत्र आढळणारे आजार, धोरणे व योजना, प्रथमोपचार आणि मानसिक आरोग्य अशा इतरही विविध विषयांची माहिती दिली आहे.

३. शिक्षण ह्या विभागाद्वारे विद्यार्थी व शिक्षकांना शैक्षणिक स्रोत पुरवले जातात. तसेच बालहक्क, दर्जेदार शिक्षण ह्यांबाबतची माहिती दिली जाते.

४. समाजकल्याण ह्या विषयामधून आपल्याला महिला व बालविकास, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक, अपंग तसेच ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण, गरिबी दूर करणे, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी बाबींची माहिती मिळते.

५. ऊर्जा विभागाद्वारे वाचकांना तंत्रज्ञान, सर्वोत्तम कार्यपद्धती, धोरणे व योजना, तसेच ऊर्जाबचत, सुधारित ऊर्जा-कार्यक्षमता, पुनर्वापरयोग्य स्रोतांमधून अधिकाधिक ऊर्जा मिळवणे ह्यांसंबंधीची साठवलेली माहिती पुरवली जाते.

६. वि-शासन ह्या विषयाद्वारे सध्या जालसंजीवितरीत्या मिळू शकणाऱ्या नागरी सुविधा, वि-शासनासंबंधात विविध राज्यांनी घेतलेले पुढाकार, शासन आपल्या दारी, माहितीचा अधिकार इत्यादींबाबतची सर्व माहिती एकाच ठिकाणी मिळू शकते.

ह्याव्यतिरिक्त, जालसंजीवित (ऑनलाइन) सेवा हा ग्राहक-विक्रेता मंच आपल्याला आपली उत्पादने तसेच सेवांसाठी चांगली बाजारपेठ मिळवण्याची संधी देतो. शेती, पशुधन, हस्तकलेच्या वस्तू, यंत्रसामग्री, विजकीय वस्तू इत्यादींशी संबंधित माहिती आपण पाठवू शकता. तसेच वस्तू किंवा सेवा भाड्याने देणे, घेणे तसेच सल्लासेवेबाबतचे तपशीलही आपणांस मिळू शकतात.

त्याचप्रमाणे, 'तज्ञाला विचारा' हा जालसंजीवित मंच निवडक विषयांवरील समस्यांना तज्ज्ञांकडून निवारण मिळवून देतो. प्रश्नकर्ते आपल्या भाषेत प्रश्न पाठवू शकतात आणि विद्युत-निरोपांद्वारे तज्ज्ञांचा सल्ला मिळवू शकतात.

**संकेतस्थळाचा वापर**

अनेक व्यक्तींनी स्वतः होऊन पुरवलेली माहिती, चित्रे, संचिका तसेच त्यांच्या विशिष्ट ज्ञानशाखेशी संबंधित बाबींमुळेच ह्या संकेतस्थळावर दिसणारा आशय दाखवणे

शक्य झाले आहे. हे संकेतस्थळ चार प्रकारच्या वापरकर्त्यांना आधार देते.

१. निनावी अथवा अज्ञात वापरकर्ता
२. नोंदणीकृत सदस्य
३. आशय-लेखक
४. आशय-परीक्षक

निनावी अथवा अज्ञात वापरकर्त्याच्या रूपाने आपण आशय न्याहाळू (ब्राउझ करू) शकता, आशयाचा शोध घेऊ शकता, विरोप किंवा सामाजिक माध्यमांमार्फत आशयाचा सामाईक वापर करू शकता, आशयाची देवाणघेवाण करू शकता.

नोंदणीकृत सदस्य झाल्यानंतर आपणांस निनावी अथवा अज्ञात वापरकर्त्याला मिळणारे सर्व लाभ मिळतातच. त्याशिवाय आपण आपली व्यक्तिरेखा लिहू शकता, अद्ययावत करू शकता. आपला दर्शनपट अनुकूलित (डॅशबोर्ड कस्टम) करू शकता. तेथे दर्शनपटाचे नित्यचित्र (डीफॉल्ट) स्थापन करू शकता. आपले अंशदान पाहू शकता. चर्चामंचावर विषयांची चर्चा करू शकता.

आशय-लेखक झाल्यानंतर आपणांस नोंदणीकृत सदस्याला मिळणारे सर्व लाभ मिळतातच. त्याशिवाय आपण आशयाची पृष्ठे सामील करू शकता. ज्या विभागामध्ये आपणांस आशय-लेखकरूपात मान्यता असेल, तेथे आपण नवीन पृष्ठ सामील करू शकता. ज्या विभागात आपणांस आशय-लेखकरूपात मान्यता असेल त्यामधील पृष्ठांचे आपण संपादन करू शकता.

आशय-परीक्षक झाल्यानंतर आपणांस आशय-लेखकाला मिळणारे सर्व लाभ मिळतातच. त्याशिवाय आपण अलीकडील नवीन गोष्टी पाहू शकता. परीक्षण सूची पाहू शकता. ज्या विभागामध्ये आपणांस 'आशय परीक्षक' रूपात मान्यता असेल त्यामधील पृष्ठांचे आपण परीक्षण करू शकता.

असा आहे हा आपल्याकरता आपणच निर्माण करावयाच्या सुविधांचा संच. आजच हजारो पृष्ठांची माहिती साठवलेला आणि भविष्यात लाखो, करोडो पृष्ठांच्या माहिती भांडारात परिवर्तित होऊ शकण्याची क्षमता बाळगणारा ज्ञानमंच. चला तर मग, पहिल्यांदा आपण तो वापरून पाहू या. त्याचे सभासद होऊ या. तिथे जाऊन आशयलेखन करू या. परीक्षण करू या. जरी भारत सरकारने ह्या उपक्रमास सुरूवात करून दिलेली असली तरी; अंतिमतः आपल्या विकासाचा आलेख आपण स्वतःच लिहू या!

[१] विकासपीडीया http://mr.vikaspedia.in/InDG

[२] भारत-विकास-पथद्वार (India Development Gateway)

[३] भारत सरकारच्या विजकविद्या व माहिती तंत्रज्ञान विभाग, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचा (Electronics and Information Technology Department, Ministry of Communications and Information Technology, Government of India)

[४] प्रगत संगणन विकास केंद्र (C-DAC : Center for Development of Advanced Computing)

[५] सामाईक सेवा केंद्र (Common Service Center)

[६] माहिती व संवाद तंत्रज्ञान (Information and Communication Technology)

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १५**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ४५ वा. निसरापूर - बोधवडा (शिवमंदिर) रामदासबाबा**

निसरापूर हनुमान मंदिरातील बाबांचे नाव तोतलाराम आहे. हे आज चिखल्दा गावात समजले. निसरापूर हे मोठे गाव/शहरवजा आहे. सकाळी तिथे पोहे खाल्ले, चांगले होते. रस्ता डांबरी आहे. पण एका वाहनासाठी असा अरुंद आहे. त्यामुळे सतत अगदी कडेने/खाली उतरून चालावे लागले.

वाटेत हाक मारून चहा विचारतात/देतात. पाठोपाठ आणि कुणी विचारतो. विनयपूर्वक नकार देऊन पुढे जातो.

चिखल्दा गाव हे दक्षिण तटावरील राजघाटासमोर आहे. इथून आतला पायरस्ता सुरू झाला तो मैय्याकिनाऱ्यावरील टेकड्या, खोरी यांतून जातो. पाऊल बुडेल इतकी वस्त्रगाळ धूळ/रेती पाऊल टाकताना लक्ष ठेवावे लागे कारण खोलीचा अंदाज चुकला तर भरपूर धूळ उडे. ऊनही तापवीत होते. बाभळी होत्या, परंतु प्रवास पूर्वेकडे आणि दक्षिण /उत्तर असलेल्या बाभळी, सावली रस्त्यावर पडेल कशी?



हळूहळू ऊन सोसायला लागले. अधूनमधून मैय्या दर्शन देत होती म्हणूनच चाल सुसह्य झाली. वाटांना वाटा फुटत होत्या. गाडीरस्ते अनेक होत होते कारण रेतीचे (बेकायदा) उत्खनन शिगेला आहे. हा भाग बुडित क्षेत्र म्हणून घोषित झाला असावा. चिखल्दा गावही त्यातच परंतु आजवर मैय्याने गाव गिळलेले नाही. कदाचित बंधारा उंची योजनेपेक्षा कमी असेल किंवा धोका नको म्हणून बुडित क्षेत्रात समाविष्ट केला असेल!

हा प्रवास सिसावद आणि राजघाट या प्रवासाची आठवण देत होता, परंतु तेव्हा ऊन फार म्हणजे फार होते आणि अगदी जीव काढला होता. आज मात्र थंडी आणि मैय्याचे सामीप्य यामुळे फार भास न होता ५ च्या अगोदरच आम्ही बोधवडा हा तीरावरील आश्रम गाठला.

मध्यप्रदेशात शिरल्यापासून लेकुरवाळ्या बोरी दिसल्या नाहीत. टणटणीची फुले गुलाबी/पांढरी, पण फिक्याच रंगाची दिसली.

खोऱ्यात काही ठिकाणी शेतीची लागवड दिसली. (दक्षिण-राजघाट/सियावद मार्गावर रुक्षता नि रूक्षताच!)

बोधवडाजवळ आल्यावर पुन्हा ऊस दिसला. राजगिरा लाल फुलांनी गच्च भरला होता. जोडीला कापूस आहेच. पण सरता! कापूस जाऊन गहू येतोय. हरभराही काही दिवसांपासून दिसतोय.

आश्रमात पागे दांपत्य भेटले. पतिराजांची ही तिसरी आणि या वेळी सपत्नीक तीन वर्षांची परिक्रमा सरूआहे.

आलो तेव्हा जेवणे चालू होती. आम्हांलाही लगेच प्रसाद घ्यावा लागला; स्नान नंतर केले, मैय्याकिनारी!

कुक्षी या जवळच्या गावातील २०/२५ तरुण सकाळी इथे आले. दाल-बाटी (साहित्य आणून) तयार केली व दिवसभर भंडारा केला. आज होता प्रदोष! दर प्रदोषाला हा कार्यक्रम असतो.

अंगणात रात्री उशिरापर्यंत धुनी पेटवून बाबा शेकत बसले होते. मीही त्यात सामील झाले. इतर सर्व झोपले होते. महाभारत मालिकेतील 'गीतोपदेश' मोबाइलवर सुरु होतो तो ऐकायला फार छान वाटले. गीता तत्त्वज्ञान रोचक पद्धतीने सादर केले होते. बी. आर. चोप्रा यांना धन्यवाद.

आश्रमाजवळच मैय्याकिनारी शेतीसाठी अनेक मोटरपम्प लागले आहेत. रात्री ८ वाजता वीज आली तेव्हापासून रात्रभर त्यांचा आवाज व पाण्याच्या कारंजी लीकेजचा आवाज सुरु होता.

अडीच हजार वर्षांपासून या आश्रमात अखंड ज्योती (काचेच्या पेटीत) तेवत आहेत. तूप घातले जाते, पण महंत बाहेर असले तरी ज्योती विझत नाहीत असे सांगितले जाते.

**दिवस ४६ वा. बोधवाडा-पेरखड कि.मी.१५ मुक्काम : राममंदिर**

आज सकाळी आग्रहामुळे निघायला उशीर झाला. ८-१५ वा. चहाची आणि कालची उरलेली कडाई यासाठी. स्नान केल्याशिवाय अग्नी नाही आणि पागेताई आरामात स्नान/कपडे करून आल्या.

पुढील प्रवास कमी असल्याचा दिलासा होता म्हणून चालले. काल रस्ता सोडून आरामासाठी मैय्याकिनारी सावे लागले होते. पुन्हा पण कच्चा रस्ता धरून वाटचाल सुरू केली.

आज थंडी कमी आहे. अंगातला स्वेटर लवकरच काढावा लागला. गेले दोन-तीन दिवस थंडीमुळे लघुशंकेसाठी तीन चार वेळा उठावे लागले आहे. पुन्हा येऊन स्लीपिंग बॅगमध्ये शिरले तरी गेलेली ऊन परत यायला बराच वेळ लागतो व तोवर झोप नीट येत नाही.

ऊस, हरभरा, गहू, मिर्ची, भुईमूग (एका ठिकाणी), राजगिरा ही लागवड पार करत करत आम्ही चाललो होतो. बांधावर प्रायः कडुनिंबाची झाडे दिसली. केळी लागवडही बरीच दिसली. मक्याला तुरे आले आहेत, पण लागवड या भागात कमी दिसली.

मैय्या जवळ असल्याने पाणपक्ष्यांचा आवाज आणि खंड्या पस्याचे दर्शन घडत होते. खारी अगदी मुक्तपणे हुंदडत असतात. डोंबिवलीतून खारी नाहीशा झाल्या आहेत.

कच्च्या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी पाऊल पाऊल मऊ वस्त्रगाळ माती/रेती/धूळ भेटत राहते. अनेक ठिकाणी पाणी वाळूत गेल्या ठिकाणी जमिनीवर प्रचंड



प्रमाणावर पांढरा थर दिसतो. अगदी क्षराचा प्रभाव! एकतर जमिनीत/दगडात चुनखडीसारखे काहीतरी असावे किंवा शेतात जे रासायनिक खत वा रसायने फवारतात ती पाण्यात मिसळून वाहत्या पाण्यातून जमिनीवर हा परिणाम तर घडवीत नसावीत?

११॥ वाजून गेले होते. एकबरा गावातून चाललो होतो. चहाचे दुकान नव्हते (दुकान कोणतेच नव्हते.) एका तरुणाने चहा देण्याची तयारी दर्शविली. आम्हांला घरी नेले, बसायला दिले व त्याच्या कुटुंबीयांनी आम्ही जेवणाचे काय करतो, स्वतः करून घेतो की कसे इत्यादी चौकशी आपुलकीने केली.

परिणामतः आम्ही स्नान व भोजन त्यांच्याकडे केले. त्यांचे नाव वीरेन्द्र सोळंकी (दरबार) म्हणजे राजपूत. त्यांचे ७ काका (७ भावंडे) इथेच राहतात व ७ घरांचा सर्व टापू शेतासह यांचा आहे.



आम्ही स्नानासाठी मैय्याकिनारी गेलो. एकजण त्यासाठी बरोबर आला होता. उत्तम खडक असलेली छान जागा त्याने स्नानासाठी दाखविली. स्नान आटोपले. लुंगी वाळली, निघालो.

सापाची (बहुधा नागाची) कात त्या खडकाजवळ दिसली. आज सकाळीच सौ. पागे म्हणे की त्यांना सतत सापांचे दर्शन होते. कालच म्हणे बाबांनी एक मोठा साप पंपामधून उचलून बाहेर सोडून दिला होता.

सकाळी हरभऱ्याच्या शेतात दोन - एक तरुण शोधक नजरेने रोपे न्याहाळीत होते. संक्रांत जवळ आहे म्हणजे हरभऱ्यात दाणे भरले असावेत. मालकाला न विचारता रोपे उपटण्याचा त्यांचा मानस वाटला. ते काय करतायत बघायला आम्हांला वेळ नव्हता.

जेवून आम्ही पुढे निघालो आणि एका शेतातून एक व्यक्ती हरभऱ्याच्या (घाट्याच्या) तीन जुड्या घेऊन बाहेर आली व आम्हांला त्या भेट दिल्या. मोटरसायकलवर बसून ही व्यक्ती दत्तवाड्याला (द. तीर) समोरच्या तीरावर कडाईसाठी निघून गेली. नर्मदे हर!

५-५.३० पर्यंत चालतो आणि पेरखड या गावी पोहोचलो. एक आश्रम किनाऱ्यावर, गावापासून दूर आहे (भोगेश्वराश्रम). दुसरे ठिकाण गावातील राम मंदिर, तिथे उतरा असा सल्ला गाव चौफुलीवरील व्यक्तीने दिला व आम्ही राम मंदिरात मुक्काम ठोकला. येथील पुजारी आठ, दहा दिवसांपूर्वीच नव्याने आले आहेत. त्यांच्या पत्नीने खिचडी करून वाढली. रात्री आरतीनंतर गावकरी (समोर राहणारे) प्रेमाने बसले, त्यां तीला एका वृद्ध महिलेने ३० वर्षांपूर्वी ३-३-१३ म्हणजे मोठी परिक्रमा केली होती व दुसऱ्या एका तरुणाने एक वर्षाची परिक्रमा केली होती.

या वृद्धेचे सर्व कपडेही शूलपाणी झाडीमध्ये लुटले गेले होते! (नंतर एक - एक दानात मिळत गेले.)

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# समिधाच सख्या या

*भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतीकारक कुटुंबातील स्त्रीयांच्या कर्तृत्वाचे स्वरूप कळावे हाच या लेखाचा उद्देश*
*- संपादक*

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते हे वाक्य आपण अनेकदा ऐकतो. पण बऱ्याचदा तिने त्याच्या यशात कशा प्रकारे योगदान दिले हे समाजापुढे मांडलेच जात नाही. अनेक क्रांतिकारकांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात कारावास भोगला, हाल-अपेष्टा सहन केल्या तर कित्येकांनी हौतात्म्य स्वीकारले आणि त्याची यथोचित दखल इतिहासात घेतली गेली. पण क्रांतिकारक कुटुंबातील स्त्रियांनी घरात राहून, क्वचित प्रसंगी घराबाहेर पडून केलेला त्याग, योगदान आणि देशसेवा या त्यांच्या कार्यासाठी इतिहासाने त्यांची दखल कधीच घेतली नाही. त्यांना सोसावे लागलेले शारीरिक-मानसिक क्लेश, सामाजिक अवहेलना आणि राजकीय त्रास हा क्रांतिकारकांनी भोगलेल्या तुरुंगवासाच्याही पलीकडचा होता. आपल्या कर्तृत्वाने नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करणाऱ्या आजच्या स्त्रीला पूर्वीच्या स्त्रियांच्या कर्तृत्वाचे स्वरूप कळावे हाच या लेखाचा उद्देश.

ज्यांच्या बलिदानाने स्वातंत्र्यासाठी आत्मयज्ञ करण्याची प्रेरणा अनेकांना मिळाली ते आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या द्वितीय पत्नी गोपिकाबाई या भोर संस्थानातील पडघोलीचे श्री. काशीनाथशास्त्री कुंटे यांच्या सुकन्या पूर्वाश्रमीच्या गोदुबाई. विवाहानंतर त्यांचा संसार पुण्यात नरसोबाच्या देवळात सुरू झाला. खोल्या दोनच, त्यातच वासुदेवरावांचे दोन्ही धाकटे बंधूहि त्यांच्याकडे शिकायला होते तरीही गोपिकाबाईनी त्याविषयी कधी तक्रार केली नाही. गोपिकाबाईंना लेखनवाचन उत्तम येत होते. त्या कठीण संस्कृतही अस्खलितपणे वाचू शकत होत्या. वासुदेवरावांना वर्तमानपत्र वाचून दाखविणे हा त्यांचा नेहमीचाच उद्योग होता. गोपिकाबाईं घोड्यावर बसणे, दांडपट्ट्याचे हात करणे आणि बंदूक उडविणे यांत तरबेज होत्या. गोपिकाबाईंनी वासुदेवरावांच्या क्रांतिकार्यात फार मोठी मदत केली होती. त्यांना आपल्या पतीच्या कार्याविषयी पूर्ण जाणीव होती त्यामुळे त्यांनी कधीच कसली मागणी केली नाही. वासुदेवराव स्वत: त्यांच्याबद्दल असे म्हणतात की पहिल्या बायकोपेक्षा या कुटुंबाचा स्वभाव फारच शांत, पहिली कधीतरी दागिन्यांसंबंधी गोष्ट करी पण हिने कधी चकार शब्दसुद्धा काढलेला नाही. हिच्यासारखी शांत बायको मिळणे कठीण. पदार्थ-पक्वान्न करण्यात कुशल, आणि फार न बोलता समजून घेणारी अशी बायको दहा लक्षातही मिळणे कठीण.

१८७७ मध्ये वासुदेवरावांची रामोशी सेना क्रांतिकार्याला सज्ज झाली. वासुदेवरावांनी बाईंना जुन्नरला सोडले. तो निरोप शेवटचा ठरला. १७ फेब्रुवारी १८८३ ला वासुदेवराव अनंतात विलीन झाले. बाईना त्यांना शेवटचे पाहतादेखील आले नाही. बाई नंतर सत्तावन्न वर्षे वैधव्यात अत्यंत खडतर आयुष्य जगल्या आणि ११ सप्टेंबर १९४० ला त्याही अनंतात विलीन झाल्या.

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक अजरामर व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकमान्य टिळक. टिळकांच्या पत्नी सत्यभामाबाई या फारशा शिकलेल्या नव्हत्या. १८७१ साली त्यांचे लग्न टिळकांशी झाले तेव्हा त्या १० वर्षांच्या आणि टिळक १५ वर्षांचे होते. रत्नागिरीतील लाडघर

गावची तापी पुण्यात टिळकांच्या घरी आली आणि 'वाचणे' शिकली. पुढे पुढे तर त्या केसरीही वाचत असत. तरतरीत चेहरा आणि दणकट बांधा यामुळे त्या चारचौघींत उठून दिसत. त्या स्वभावाने भिडस्त आणि रागीट होत्या, पण टिळकांचाही स्वभाव रागीट असल्याने त्यांना आपला राग गिळावा लागे. त्यांची राहणी साधी होती. दागदागिन्यांची फारशी आवड नव्हती. पण त्या अत्यंत अगत्यशील होत्या. अनेक राजकीय-अराजकीय पाहुण्यांची जेवायची व्यवस्था टिळकांच्या घरीच असे त्याशिवाय माधुकरीवाले असत. या सगळ्यांना न कुरकुरता त्या मायेने वाढीत. टिळकांकडे काम घेऊन आलेल्या बायकांना टिळक लगेच भेटू शकणार नसतील तर त्यांना आत बसवून त्यांची दु:ख, अडचण जाणून घेत असत. टिळकांनीदेखील घरच्या या लक्ष्मीला कधी दुखवले नाही. घरात सर्व सत्यभामाबाईंच्या म्हणण्याप्रमाणे होई. अशा या सुखी संसारात १८९७ साली मोठे वादळ आले. टिळकांना दीड वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. बाईंनी काही काळ अन्नत्यागही केला. टिळकांचे 'लॉ' क्लासेस आणि केसरी बंद पडला. घराची आर्थिक स्थिती बिघडली, त्याही परिस्थितीत त्या कणखरपणे उभ्या राहिल्या. यानंतर थोड्याच कालावधीत त्यांचा मोठा मुलगा प्लेग गेला तेही दु:ख त्यांनी पचविले. पाठोपाठ १९०८ मध्ये टिळकांना अटक झाली. टिळकांची रवानगी मंडालेला करण्यापूर्वी त्यांना सत्यभामाबाईंना भेटूही दिले गेले नाही. टिळकांना जन्मठेपेची शिक्षा झाली हे सांगायला आलेले काकासाहेब खाडिलकर रडत होते, तोंडून शब्द फुटत नव्हता सत्यभामाबाईंनीच त्यांना विचारले किती वर्षांची शिक्षा झाली? आणि लोकांच्या कल्याणासाठी झटण्याला शिक्षा झाली तर त्यात रडण्यासारखे काय आहे? हे विचारताना त्यांच्या आवाजात अजिबात कंप नव्हता. अखेर मधुमेहाचे दुखणे विकोपाला जाऊन १९१२ साली त्यांचे निधन झाले. त्यांना पतीला शेवटचे पाहताही आले नाही. लोकमान्य कोण हे माहीत असणाऱ्या आजच्या पिढीला टिळक कारावासात असताना संसाराचा गाडा नेकीने ओढणा-या सत्यभामाबाई माहीत असणे कठीणच.

टिळकांचे सोबती आणि सामाजिक क्रांतीचे अग्रणी सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या पत्नी यशोदाबाई आगरकर ह्यांचे मूळ नाव अंबू फडके. माहेर-सासर बेताच्याच परिस्थितीतील त्यामुळे त्या खूप कष्टप्रद जीवन जगल्या. यशोदाबाई देवभोळ्या होत्या त्याबद्दल अनेकांनी आगरकरांना विचारले की तुम्ही देव मनात नाही आणि तुमची बायको मात्र रोज देवळात जाते हे तुम्हांस कसे चालते? यावर आगरकर म्हणतात, प्रत्येक व्यक्तीला मतस्वातंत्र्य आहे. त्या त्यांच्या मताप्रमाणे चालतात आणि मी माझा मताप्रमाणे. पण कर्मकांड करू नये या आगरकरांच्या विचारांना मात्र याशोदाबाईंनी खूप साथ दिली. आगरकरानी आपल्या पत्नी यशोदाबाई यांना वाचायला शिकविले होते. ते त्यांच्याकडून 'सुधारक' मधील लेख वाचून घेत असत. आगरकरांच्या मरणापूर्वी यशोदाबाईंनी त्यांना, मी आपल्या माघारी सोवळी होणार नाही, अस वचन दिले होते, त्याला जागत त्यांच्यामागे लोकांचा विरोध झुगारून त्यांनी सोवळी न होण्याचाच निर्णय घेतला. लोकांनी कुत्सितपणे त्यांना पुनर्विवाह करण्याचे सुचविले, तीही बोलणी त्यांनी सहन केली. आगरकरांच्या पुनर्विवाहाच्या विचारांचा लोकांनी केलेला विपर्यास बघून त्यांचे मन व्यथित झाले. त्यानंतर त्या अकोल्यात आगरकरांच्या मामांकडे जाऊन राहिल्या व सुइणीचे काम करू लागल्या. सुइणीचे काम करताना त्यांनी कधी जातीपातीचा विचारही केला नाही. विधवांबद्दल त्यांना अतिशय सहानुभूती होती. एक-दोन बालविधवांना त्या घरी लिहायला - वाचायला शिकवीत असत. अकोल्यातील एका जाहीर सभेत त्यांनी, विधवांनी कुंकू का बरे लावू नये? मुलगी लाग्नाआधीही कुंकू लावीत असते तेव्हा नवऱ्याच्या असण्या, नसण्याचा कुंकवाशी काही संबंध नाही म्हणून नवरा गेल्यावर

विधवांनी कुंकू लावावे. असे परखड मतप्रदर्शन केले होते. स्त्रियांच्या पेहरावाबद्दल गोपाळरावांची जी मते होती त्याप्रमाणेच त्या पेहराव करीत. रंगीत लुगडी नेसत. तळेगावातून काचेच्या बांगड्या आणून विकत आणि ते पैसे समाजसेवी संस्थाना देत असत. अशी ही पतीच्या कार्याचा वारसा निष्ठेने चालवणारी कर्मयोगिनी! जिच्या कणखरपणाची इतिहासाने फारशी दखलच घेतलेली नाही.

वासुदेवराव फडक्यांचे हौतात्म्यवर्ष हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जयंतीवर्ष जणू वासुदेवरावांचा पुनर्जन्मच. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या लिखाणात सातत्याने येतात त्या आईसमान येसूवहिनी. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे मोठे बंधू क्रांतिकारक बाबाराव सावरकर यांच्या पत्नी. येसू वहिनींचा जन्म १८८५ ला त्र्यंबकेश्ववर क्षेत्री फडके कुटुंबात झाला. १८९६ मध्ये त्यांचे लग्न बाबाराव डसत्यभामाबाईनीचउर्फ गणेश दामोदर सावरकर यांच्याशी झाले. सावरकरांच्या घरात येऊन येसूबाई लिहिणे - वाचणे शिकल्या. सुरुवातीला वहिनींचे आयुष्य छान होते नंतर वतनदारी गेली आणि पाचवीला पुजलेली गरिबी आली. घर क्रांतिकारकांचे होते. पण येसूवहिनी चाणाक्ष होत्या. त्यामुळेच जेव्हा मुंबईत बाबारावांना अटक झाल्याचा निरोप आला, तेव्हा रात्रीच्या रात्री त्यांनी सर्व संशयित वस्तू हलविल्या. पहाटे पाचला धाड पडली, पण पोलिसांच्या हाती काही लागले नाही आणि सावरकर कुटुंब वाचले. पुढे १९४९ मध्ये बाबारावांना 'राजद्रोही' म्हणून जन्मठेपेची शिक्षा झाली आणि त्यांना अंदमानला कारावासात ठेवले गेले. यानंतर येसुवहिनींच्या आयुष्याचा खडतर प्रवास सुरू झाला. समाजाने कैद्याची बायको म्हणून वाळीत टाकलेल्या, निर्धन, बेघर झालेल्या येसूवहिनी या साऱ्याने डगमगून गेल्या नाहीत तर नवीन उमेदीने उभ्या राहिल्या आणि स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय त्यांनी सहभाग घेतला. स्वदेशीचे व्रत त्यांनी आजन्म पाळले. क्रांतिकार्यात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांच्या बायकांना आधार देण्यासाठी 'आत्मनिष्ठ युवती संघ' या नावाने एक महिला मंडळ सुरू केले. संघाच्या सभेत वर्तमानपत्रातील निवडक बातम्या व लेख वाचून त्यांवर चर्चा होत असे. या सगळ्या महिलांनी स्वदेशीची दीक्षा घेतली होती.

नारायणराव बाबारावांना भेटण्यासाठी पोलीस कोठडीत गेले होते. ही संधी साधून पोलिसांनी सावरकरांच्या घरावर धाड घातली. त्यात त्यांना सर्व कार्यकर्त्यांची नावे व पत्ते मिळाले. कितीतरी तरुण पकडले गेले व त्यांची बायकामुले अक्षरश: रस्त्यावर आली. त्यांना धीर व मदत देण्याचे काम येसूवहिनींनी केले. तेव्हा त्या अवघ्या पंचवीस वर्षांच्या होत्या. जेव्हा नारायणराव पकडले गेले तेव्हा स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांचे सांत्वन करण्यासाठी लिहिलेल्या कवितेतील 'तू धैर्याची असशी मूर्ति । माझे वहिनी माझे स्फूर्ती ॥' या दोन ओळीच येसूवहिनीबद्दल खूप काही सांगून जातात.

क्रांतियज्ञात अबोलपणे आपल्या तनमनाची आहुती देणाऱ्या या दिव्य समिधांना माझी भावपूर्ण शब्दसुमनांजली.

(माहिती विविध माध्यमांतून संकलित )

**डॉ. सौ. अनघा गोखले**
वि. प्र. मं. चे महर्षी परशुराम अभियांत्रिकी
महाविद्यालय, वेळणेश्वर.
E-mail- anagha.gokhalevpmmpcoe.org
भ्रमणध्वनी ९८५०८९०३८२

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# '(कमी) बोलण्याची कला'

*'कमी पण मुद्देसूद बोलण्याची कला' शिकणे महत्वाचे आहे. हे विशद करणारा लेख - संपादक*

मंचावरील सर्व मान्यवर व प्रेक्षक तन्मयतेने मंत्रिमहोदयांचे भाषण ऐकत होते. उंची वस्त्रे परिधान केलेले, उत्तम व्यक्तिमत्त्व लाभलेले आमचे सत्कारमूर्ती मंत्रीसाहेब हातातील छायांकित प्रती पटापट उलटत होते. त्यांतील मजकूर त्यांच्या सचिवाने लिहून दिलेला होता. सुरुवातीला भाषण रोचक वाटले. एक तास उलटून गेल्यावर प्रेक्षकांच्या लक्षात आले की मंत्रीसाहेब तेच तेच मुद्दे पुन्हा सांगत आहेत. दोन तास उलटूनसुद्धा जेव्हा साहेबांचे भाषण संपेना, तेव्हा सचिवाने पुढाकार घेतला आणि साहेबांच्या कानाजवळ जाऊन पुटपुटला, 'साहेब, भाषणाचा मुख्य मजकूर केव्हाच संपला. तुम्ही भाषणाची Xerox copy वाचत आहात!'

मित्रांनो, या विनोदी प्रसंगावरून एक म्हण आठवली - 'जेथे शब्दांचा सुकाळ तेथे बुद्धीचा दुष्काळ.' माझे अनेक विद्यार्थी मला विनंती करतात, 'मॅडम, आम्हांला भाषाकौशल्य शिकवा; प्रेक्षकांसमोर फाड फाड इंग्रजीत/ मराठीत कसे बोलायचे ते शिकवा, पण माझं असं ठाम मत आहे की 'बोलण्याची कला' शिकण्यापेक्षा 'कमी पण मुद्देसूद बोलण्याची कला' शिकणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भावनांच्या ओघात, दुसऱ्यावर छाप पाडण्यासाठी, वेळ मारून नेण्यासाठी किंवा अतिउत्साहात आपण अवाढव्य वाक्ये, बोजड शब्दप्रयोग, विसंगत उदाहरणे व निरर्थक माहितीची पेरणी करतो. परिणामी, तुम्हांला नेमके काय म्हणायचे आहे याविषयी ऐकणारी व्यक्ती बुचकळ्यात पडते. It is easy to speak complex words but truly a difficult art to speck simpler. भाषा हे संप्रेषणाचे साधन आहे. कोणत्याही पातळीवर माहितीची देवाणघेवाण करताना तुम्हांला जर १०० टक्के प्रतिसाद व प्रत्याभरण (Response and feedback) मिळवायचा असेल तर एक तत्त्व लक्षात घ्या. The K.I.S.S. principle ( Keep it short and simple)

बोलताना काळ-वेळेचे भान ठेवणे आवश्यक, ऐकणाऱ्यांचा वयोगट, त्यांची वैचारिक/ बौद्धिक/ मानसिक पातळी काय आहे, बोलण्याचा हेतू काय आहे याचा विचार करावा. तुम्ही निरर्थक आनाकलनीय बोलत आहात हे कशावरून ओळखावे?

१) तुमचे मित्र जांभया देत घड्याळाकडे पहात आहेत.

२) अनेक मित्र सबबी सांगून बैठकीतून उठून जात आहेत.

३) तुम्हांला पाहताच तुमचे मित्र विरुद्ध दिशेने पळ काढतात.

४) तुम्हांला 'मिस्टर बोअर' किंवा 'बडबड बादशाह' अशी टोपणनाव पडली आहेत.

५) घरातील मंडळी कानात कापसाचे बोळे/ Ear-plugs लावून वावरतात.

तुम्ही बोलत असताना वरील बाबी घडत असतील तर लक्षात घ्या. तुमचे बोलणे समोरच्याला समजत नाही किंवा कंटाळवाणे आहे. आता तुम्ही विचाराल, 'मग, गप्पच बसायचं का? 'नाही... बोला' पण सर्वप्रथम तुमची ऐकण्याची क्षमता विकसित करा.'

(पृष्ठ क्र. ३९ वर)

# चारुकर्णे शिरीष : भारतीय पुष्पश्रृंगार

*काळाच्या कसोटीला पुरून उरणारं साहित्य हेच खरं चिरंजीवी असत म्हणूनच कालिदास आजही वाचावासा वाटतो हे दर्शवणारा लेख - संपादक*

कविताकामिनीचा विलास म्हणून ज्याला संस्कृत साहित्यात गौरवलं आहे अशा कालिदासाच्या वाङ्मयाचा अभ्यास ही एक नितांतसुंदर पर्वणीच असते. ज्येष्ठ आधुनिक (Modernist) कवी एझ्रा पाउंड यांनी साहित्याची एक व्याख्या केली आहे. ते म्हणतात 'Literature is a news which stays news' अर्थात साहित्याचा 'नित्य नूतन नवे' असण्याचा गुण सर्वच भाषांतील ज्येष्ठ लेखकांनी वर्णिला आहे. 'दिनेदिने यन्नवतामुपैति तदैव रूपं रमणीयतायाः' अर्थात रोज नावीण्याची झळाळी येणाऱ्या शाश्वत वस्तुला रमणीय म्हटलंय.

अगदी याच श्लोकाचा अनुवाद वाटावा इतकं सुंदर व मोहक वचन जॉन कीटस् या प्रसिद्ध इंग्रजी कवीनं उच्चारलंय.

"A thing of Beauty is joy forever :
Its lovelines increases;
It will never pass into nothingness" (Endymion)

वरील वचनं उदधृत करण्यामागे एकच विचारसूत्र आहे व ते म्हणजे काळाच्या कसोटीला पुरून उरणारं साहित्य हेच खरं चिरंजीवी असत म्हणूनच कालिदास आजही वाचावासा वाटतो आणि शेक्सपिअर अजूनही हवाहवासा वाटतो

**चारुकर्णे शिरीषं** : भारतीय साहित्यातील पुष्पश्रृंगार

चैतन्याचा व स्नेहाचा खळखळता प्रवाह म्हणून कालिदासाची वाणी सर्वदूर परिचित आहे. मागे अभिज्ञान शाकुंतल वाचत असताना 'शिरीष' या फुलाच्या संदर्भाशी थबकलो. कालिदासाच्या नितांतसुंदर निसर्गवर्णनाने काव्यात जे रंग भरले आहेत ते थक्क करणारे आहेत. विशषतः शकुंतलाचा प्रथम अंक. विचार केला, 'शिरीष' या शब्दावर लेख लिहिता येण्याएवढी माहिती जमा करूया.

शिरीष शब्दापुढे सुकुमारतेचा उल्लेख आपटे कोशात आढळतो. त्यांनी कुमारसंभवातील एका सुंदर श्लोकाचा उल्लेख केला आहे.

शिरीषपुष्पाधिकसौकुमार्यो बाहु तदीयाविती मे वितर्कः ।
कु.संभव (१।४१।)

इथे बहुधा पार्वती शिवाची उपासना करताना (अपर्णा व्रत करते काननी) कालिदासाला न राहून उपमा सुचली असावी की, शिरीषपुष्पाच्याहीपेक्षा अधिक कोमल तुझे बाहू दिसतात वगैरे -

शृ या मूळ शब्दाचा अर्थ शिर, नाडी (tubular form) असा आहे. शिरसाचं फूल असंही ढोबळपणे याला म्हणता येईल. शाकुंतलाच्या प्रथम अंकात व पुढे सगळीकडेच कालिदासाने निसर्ग फुलवताना फुलांची बहारदार वर्णन केली आहेत. अर्थात त्याने वर्णिलेली अनंत फुले सध्या आढळतात की नाही हा परत संशोधनाचा विषय. जेव्हा मेघदूत वाचतो तेव्हाही हीच प्रचिती येते.

कण्बमुनींच्या आश्रमात दुष्यंताचा प्रवेश होतो व खऱ्या अर्थाने आश्रमातील वातावरणाची चाहूल लागते. हरिण व अन्य श्वापदं इतक्या निवांतपणे चरताहेत की, त्यांना पारध्याची किंचितही आशंका नाही कारण कण्वाश्रमात शिकार निषिद्ध आहे. राजाला समजतं की कण्वमुनी आश्रमात नाहीत व एकटी शकुंतला काही तपस्विनींबरोबर आहे. flashbook system अथवा change of point of view चा उपभोग करून कालिदास राजाच्या अंतःकरणात जी आंदोलनं चालू आहेत त्याची

अचूक टिपणं काढतोय. के. अत्रे खालील संवादाचा नेहमी चपखलपणे वर करत असतं. अश्लीलता ही किती आहे हे त्यातून सिद्ध होतं. शकुंतलेने वल्कले धारण केलेली आहेत व ती झाडांना पाणी घालते आहे. राजा लपून हे सगळं पाहतोय शकुंतलेच्या दोन प्रियसख्या प्रियंवदा व अनसूया हातात घडे घेऊन पाणी घालताहेत.

अये एतास्तपस्विकन्यकाः स्वप्रमाणानुरूपैः सेचनघटैर्बालपादपेभ्यः पयोदातुमित एवाभिवर्त अहो मधुरमासां दर्शनम् ।

इथे कालिदासाने स्वप्रमाणारूपैः हा शब्द अत्यंत योजकपणे वापरला आहे. त्यांच्या हातातील घट हे त्यांच्या वयानुसार आकारात बदल असलेले आहेत. म्हणजे आपल्याकडे Neoclassical Age मध्ये Order, ecorym या शब्दांचा बोलबाला होता तसंच संस्कृत काव्यशास्त्रात 'औचित्यविचार' आलेला आहे राजा म्हणतोय, मधुरमासां दर्शनम्

शकुंतलेने धारण केलेलं वल्कल जरा घट्ट झाल आहे आणि ती थोडीशी रागात येऊन म्हणते.

शकुंतला : अये सखी अनुसये! । अतिपिनद्धेन वल्कलेन प्रियंवदया नियन्त्रितास्मि शिथिलय तावदेतत् ।

प्रियंवदा : अत्र पयोधर विस्तारयित कमात्मनो यौवनम् उपालभस्व । मां किमुपालभसे ।

''एकदम घट्ट झालेल्या वल्कलाला जरा सैल कर बरं, अनुसये''. तेव्हा प्रियंवदा लगेच, ''अगं, मला कशाला दोष देते आहेस, पयोधरांचा विस्तार करवून आणणाऱ्या त्या यौवनाला दोष दे !''

नाजूकतेने श्रृंगार कसा अप्रतिम करता येतो हे कालिदासाकडून शिकायला हवं याला विप्रलंभ श्रृंगार असं म्हणतात. अत्रे म्हणतं की हा विषय artistically किती छान हाताळला कालिदासाने नाहीतर आपल्याकडे लावण्यांची गलिच्छा भाषा.

राजा थोडा बावरला आहे. त्याचं चित्त हरलं आहे. तितक्यात कालिदास आपली दृष्टी निसर्गाकडे नेतो व स्त्रिया स्वतःला कशा सजवतात ते सांगतो. अर्थात शकुंतलेला अनेक आंग्ल विश्लेषकांनी शेक्सपिअरच्या "Tempest" नाटकातील Miranda शी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. दोघीही निसर्गकन्या आहेत म्हणून असेल कदाचित. कालिदास शिरीषपुष्पांचं फार नाजूक वर्णन करतो.

ईषदीषच्चुम्बितानि भ्रमरैः सुकुमारकेसरशिखानि ।
अवतंसयनि दयमानाः प्रमदाः शिरीषकुसुमानि ।

ज्यांच्या केसरशिखा (Androcjum) खूप सुकुमार आहेत व थोडं हलकंसं भ्रमरांनी चुंबन केलेल्या आहेत अशा शिरीषकुसुमांना स्त्रिया (प्रमदा) अवतंसयन्ति म्हणजे कर्णभूषणे करतात. इथे कालिदासाचे प्रसिद्ध टीकाकार 'मल्लिनाथ' दोन खुलासे करतात ते म्हणजे

१. पदं सहेत भ्रमरस्य पेलवं शिरीषपुष्पं न पुनः पतत्रिणः ।

अर्थात फुले इतकी नाजूक आहेत की ज्यांच्यावर भ्रमराच्या पायाचासुद्धा भार सहन होत नाही. (संदीप खरे म्हणतो

एवढे नाजूक आहे वय तुझे माझ्या फुला
रंग देखील पाकळ्यांवर भार वाहू लागले,

२. किंवा त्याच्याहीपुढे जाऊन ज्ञानेश्वर महाराज गीतेच्या १३ व्या अध्यायावरील ७ व्या श्लोकात अहिंसा शब्दावर व्याख्यान करताना म्हणतात,

का कमळावरीभ्रमर । पाय ठेविती हळुवार ।
कुचुंबेल केसर । इया शंका ॥ (७/२४८)

ज्याप्रमाणे भ्रमर आपल्या पायांचा फुलाच्या केसराशी संबंध येऊन ते कुचुंबेल म्हणून फक्त हळुवारपणे पाय ठेवतात. अर्थात भ्रमरांच्या पायांनीच फुलांच्या सुप्रजननाचे काम चालते पण तो पुंकेसरसुद्धा दबून जाऊ नये ही काळजी माउलींच्या मते, भ्रमरांकडून घेतली जाते. अशी ही नाजूक शिरीष फुले सुंदर स्त्रिया कर्णभषण करतात.

इथे कालिदास 'प्रमदा' हा शब्द वापरतो. मल्लिनाथांनी प्रमदा या शब्दाची निरुक्ति (edymology) फार गोड सांगितली आहे.

प्रमदा - वरांगना, कमिन्यो, - प्रकृष्टो मदो रूपसौभाग्यजनीतो गर्वो यासां ताः

रूप व सौभाग्याचा गर्व ज्यांच्या मुखावर प्रकृष्टपणे विलसतो अशा त्या प्रमदा त्यांचा शृंगार करण्यास ही नाजूक शिरीषकुसुमे वापरतात. अर्थात त्या मुळातच अधिक सुंदर असणाऱ्या स्त्रियांना शिरीषकुसुमांमुळे अधिक सुंदर व्हायचं आहे. माउलींनी एक अशाच अर्थाची अप्रतिम उपमा मराठी व संस्कृत या दोन भाषांच्या संदर्भाने वापरली आहे.

आंगाचेनि सुंदरपणे । लेणीया अंगचि होई सोने ।
एथ अलंकारिले कवणकवणे । हे निर्वचेना ।

त्यांचा अभिप्राय आहे की एका सुंदर प्रमदेने अंगावर सोन्याचे अलंकार घातले आहेत (आपल्यासाठी शिरीषकुसुम). आता अंग इतकं सुंदर आहे की त्याला दागिन्यांमुळे अधिक शोभा प्राप्त होते आहे आणि (लेणी) दागिन्यांना अंगाच्या सुंदरपणामुळे अजून येते आहे. माऊलीचा genuine प्रश्न आहे की इथे स्त्रीने दागिन्यांना अलंकारित केलंय की दागिण्यांमुळे तिला सुंदर केलंय किंबहुना त्या इतक्या एकत्र बेमालूमपणे मिसळल्यात की ते पाहणाऱ्याला प्रथमदर्शनी निर्वचेन समजेना. अगदी तसं मराठी व संस्कृत या दोन भाषा ज्ञानेश्वरीत मिसळल्या आहोत असं त्यांना म्हणायचंय वाटतं.

या सुंदर शाकुंतलीय प्रवासानंतर मेघदूताची सफर करायला निघालेला कालिदास प्रत्येक ऋतूंमधील स्त्रियांची सौंदर्यप्रसाधनपद्धती सांगतो आहे. सहा ऋतूंचे 'सहा सोहळे पाहून भान हरावे' या ओळी कदाचित पाडगावकरांना कालिदासाच्या जवळ घेऊन जातात.

हस्तेलीलाकमलमलके बालकुन्दानुव्विद्धम्
गीतालोध्रप्रसवरजसा पाण्डुतामाननेत्रीः
चुडापाशे नवकुरवकं चारुकर्णे शिरीषं
सीमन्ते च त्वदुपगमजं यत्र नीपं वधुनाम्।
मेघदूत (पूर्वमेघ ७४)

यक्ष मेघाला अलकापुरीचं वर्णन करूनत्याच्या विरही पत्नीला संदेश देण्यास सांगतोय. मेघाला नेमकी त्याची नगरी कळावी व त्याहीपुढे जावून त्याची पत्नी समजावी हा या वर्णनांमागील आटापिटा असावा.

वरील श्लोकात स्त्रिया फुलांच्याद्वारे स्वतःला कशा खुलवतात याचं वास्तव चित्रच आहे.

हातामध्ये लीलाकमल धारण करणाऱ्या नवपरिणित वधु त्याचा वापर खेळण्यासाठी करतात. बालकुन्द या फुलांनी केसांना. 'लांध्र' या वृक्षाच्या फुलांच्या परागकणांनी ज्या आपल्या मुखाची पाण्डुता (fairness) वाढवतात आणि नवकुरबकाचे फूल केसाच्या गाळीशी (hairknot) लावतात. ज्या आपल्या कानात सुंदर असं शिरीषकुसुम घालतात व सीमन्ताच्या (माँग) ठिकाणी कदंबाची फुले धारण करतात.

Where woman bear a sporting Lotus in hand: their hair are wreathed with fresh kunda flowers: the beauty of their face has been rendered pale white by pollen of Lodhra flowers, they bear a fresh kuravak flower on their hariknot, a fine shirish flower in the ear and a kadamb flower, at the parting of the hair.

वरील श्लोकात एका प्रश्नाचं उत्तर कालिदास देतो. आधी स्त्रिया पावडर लावत का? अर्थातच त्या लोध्रपुण्यांच्या परागकणांना चेहऱ्याची कांती वाढवण्यासाठी वापरंत.

खरोखर Eco-criticism च्या दालनात कालिदासाला संपूर्ण न्याय मिळवून देण्याची तयारी आपल्याला करावी लागणार आहे.

One impulse from the vernal wood
May teach you more of man
of moral, evil and of good
Then all the sager can...

असं म्हणणाऱ्या William Wordsworthची कालिदासाशी नाळ जुडलेली आहे हे मात्र निश्चित.

**प्रशांत पु. धर्माधिकारी**
सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी : ९४२२४९५०९४

●●●

उपदेशक व्हा, विचारवंत व्हा, पण अगोदर आचारवंत व्हा.

# कंबोडिया, एक भयानक सत्य !

*कंबोडिया देशाची माहिती सांगणारा लेख - संपादक*

मुळातच प्रवासाची आवड असल्याने मी नेहमी मिळेल त्या संधीचा फायदा घेत असतो. विएतनामला येउन २ वर्षे होत आली होती. २ वर्षांत अख्खा विएतनाम पिंजून काढला. शेजारचा कंबोडिया देश बघायचा राहून गेला होता. पेशाने शिक्षक असल्याच्या बऱ्याच फायद्यांपैकी महत्वाचा फायदा हा की फिरता खूप येते. एका आठवड्याचा ब्रेक मिळताच कंबोडीयाचा बेत आखला. गुगलवरून माहिती घेतली तर Angkor Wat येथील विष्णूचे पुरातन मंदिर बघण्यासारखे आहे हे कळले. सीम रिप या शहरातील Angkor Wat मंदिर बघून विएतनामला परतीच्या प्रवासाला निघालो. वाटेत आमची बस (विएतनाम - कंबोडिया प्रवास बसने देखील करता येतो) एका हॉटेलमध्ये जेवणासाठी थांबली. तेथे एक छोटी मुलगी पुस्तकांचा संच घेऊन माझ्याजवळ आली आणि एक तरी पुस्तक विकत घ्या म्हणून मला विनंती करू लागली. मी फारसा उत्सुक नसताना पण शेवटी एक पुस्तक विकत घेतले. First They Killed my Father हे पुस्तकाचं नाव. सहज पहिलं पान वाचलं आणि चक्रावून गेलो. पुढच्या ४ तासांत २४० पानांचं पुस्तक संपवून टाकलं. ते पुस्तक म्हणजे कंबोडियाच्या १९७५ - १९७९ मध्ये झालेल्या भयानक नरसंहारात वाचलेल्या मुलीची आत्मकथा आहे. कंबोडिया म्हटलं की सर्वांचं आकर्षण Ankgor Wat मंदिरच आहे, परंतु माणुसकीला लाजवेल अशा भयंकर नरसंहाराकडे साहजिकच दुर्लक्ष होतं. विएतनामला परत आल्यावर पुढच्याच वीकेंडला मी कंबोडियाला पुन्हा गेलो व त्या नरसंहाराशी निगडित असलेल्या जागांवर त्या भयानक सत्याचा जवळून अनुभव घेतला. त्या भयानक नरसंहारात ४ वर्षात २० लाख कंबोडियन लोक मारले गेले. त्यातील १० लाख लोकांची अमानुष पद्धतीने हत्या करण्यात आली तर १० लाख लोक भूकाबळीचे व रोगांचे शिकार झाले. त्या वेळेस कंबोडिया देशावर ख्मेर रूज लोकांचे राज्य होते. Communist Party ऑफ Cambodia (CPK) या पार्टीच्या लोकांना ख्मेर रूज म्हणत असत. साधारण १० लाख लोक जेथे मारले गेले त्या त्या विशिष्ट जागा होत्या. त्यांना आता killing fields म्हणतात. या killing fields मध्ये लोकांना ट्रकमध्ये आणून त्यांची अमानुषपणे हत्या करून जमिनीत त्यांना पुरण्यात येत असे. अशा ३०० killing fields आज कंबोडियामध्ये आहेत. त्यांतल्या फक्त ८५ killing fields चे उत्खनन झाले असून आजही हे काम चालू आहे व हत्या करण्यात आलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. या ३०० पैकी सर्वांत मोठी killing filed कंबोडियाची राजधानी नॉम पेन्ह येथे आहे. तेथे आत्तापर्यंत २००० मृतांचे अवशेष (कवट्या, हाडे) आढळून आले आहेत. या सर्वांत मोठ्या killing filed ला जायचे असे मी ठरवले. तत्पूर्वी म्हणजेच ख्मेर रूज अस्तित्वात कसे आले व त्यांनी हे सर्व का केले याची थोडक्यात ओळख करून घेऊ .

१९५३ मध्ये फ्रान्स देशापासून स्वातंत्र्य मिळाल्यावर कंबोडिया देश उभा राहत होता. १९७० पर्यंत देशात भ्रष्टाचार प्रचंड वाढला होता. १९७० मध्ये सिंहनौक या पंतप्रधानाला पायउतार व्हावे लागले. लॉन नॉल नावाच्या लष्करातल्या अधिकाऱ्याकडे अमेरिकेच्या मध्यस्थीने सूत्रे आली. परंतु तोदेखील भ्रष्टाचाराला आळा घालू शकला नाही. सामान्य लोकांची विशेषतः ग्रामीण भागातील गरीब कंबोडियन जनतेचा सरकारवरील व सरकारमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरील राग वाढतच होता. त्यात भरीस भर म्हणजे अमेरिकन सैन्याच्या विएतनाम - कंबोडिया

बॉर्डरवरच्या बॉम्बहल्ल्यामुळे बॉर्डरवरची जनता आणखीनच संतापली. या सर्व कारणांचा फायदा घेत Communist Party Of Cambodia (CPK) आपले बस्तान बसवले व त्यांचा प्रमुख होता पोल पॉट. CPK च्या सैनिकांना लोक ख्मेर रुज म्हणून ओळखत असत.

१७ एप्रिल १९७५ रोजी पोल पॉटच्या ख्मेर रूजने कंबोडियाची राजधानी फुनाम पेन्हवर कब्जा मिळवला. बऱ्याच अंशी लोक आनंदित झाले. परंतु त्यांचा आनंद हा काही तासंपुता होता. कारण कंबोडियन लोकांच्या आयुष्यातल्या सर्वांत भीषण काळाला सुरुवात झाली होती. त्या काळात साधारण ३० लाख लोकसंख्या असलेलं शहर, ४८ तासांत रिकामं करण्यात आलं. सर्वच्या सर्व शहरवासीय खेड्यांकडे बळजबरीने नेण्यात आले. जे लोक प्रतिकार करत होते त्यांना सरळ मारण्यात आलं. आणि अशा प्रकारे कंबोडिया देशाची वाटचाल पोल पॉटच्या आधिपत्याखालील ४ वर्षांच्या अमानवी अनुभवाकडे झाली.

पोल पॉटने त्याच्या स्वप्नातला कंबोडिया प्रत्यक्षात आणायला सुरुवात केली. पोल पॉटच्या कडे जेमतेम १५००० ख्मेर रूज सैनिक होते. त्यांतले प्रामुख्याने न शिकलेले व ग्रामीण भागातील तरूण होते. पोल पॉटचे म्हणणे असे होते की शहरात राहणारे , शिकलेले व लॉन नॉलच्या काळात शासनात कोणत्या न कोणत्या प्रकारे काम करणारा म्हणजे शिक्षक, वकील, डॉक्टर व इंजीनिअर हे आपले शत्रू. त्याने या सर्वांची हत्या करण्याचा विचित्र आदेश काढला. ख्मेर रूज सैनिकांनी कुठलीही चौकशी न करता सर्व शिक्षित लोकांना मारून टाकायला सुरुवात केली. त्यामुळे लोक आपली ओळख लपवू लागले, परंतु त्याचा काहीच फायदा झाला नाही. समजा एखाद्याकडे पुस्तक सापडले तर तो त्याच्या शिक्षित असण्याचा पुरावा समजला जायचा. लोकांनी आपापली पुस्तके लपवली, जाळली. चश्मे असणाऱ्या लोकांनी आपले चश्मे फेकून दिले. परंतु ख्मेर रुज सैनिकांनी चश्मा घातल्यामुळे नाकावर येणाऱ्या खुणेवरून शिक्षित असल्याचा निष्कर्ष काढून लोकांना ठार मारले. १९७५-१९७६ या एका वर्षात जवळपास २ लाख शहरात राहणारे सामान्य नागरिक मारले गेले. या दरम्यान कोणीही शेजारच्या देशात पळून जाऊ शकत नव्हता कारण ख्मेर रूजने शेजारी देशांच्या सर्व सीमा बंद करून टाकल्या होत्या. विमानतळ, रेल्वे, बससेवा संपूर्णपणे बंद करून टाकल्या होत्या. मारल्या गेलेल्या लोकांचा दोष इतकाच की एकतर त्यांना लिहिता-वाचता येत होते अथवा ते शहरात राहत होते. ख्मेर रूजच्या काळात पोल पॉट ने सर्व प्रकारच्या उत्सवांवर बंदी आणली. प्रेम, भावना व धर्माच्या कुठल्याही गोष्टींवर त्याने प्रामुख्याने बंदी आणली. सर्वांना सारखेच कपडे घालणे म्हणजे काळा शर्ट व काळी pant व लाल मफलर गुंडाळणे आवश्यक होते. शिक्षण घेतल्याने लोकशाही व स्वातंत्र्याच्या दिशेने आपली विचारसरणी होते व आपले जीवन बरबाद होते असे सांगून त्याने शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ बंद केले. कंबोडियामध्ये आता सगळे जण फक्त भाताची शेती करतील व प्रत्येकाला सारख्याच प्रमाणात खायला मिळेल (दिवसभरात फक्त २ वाट्या भात) अशी व्यवस्था त्याने करून ठेवली. सर्व जण सकाळी ७ ते संध्याकाळी ७ शेतावर काम करतील हा प्रमुख नियम होता. या दिनक्रमात दुपारी एका तासाची सुट्टी होती. दिवसभरात मिळणारे थोडेसेच अन्न घेऊन काम करण्याची ताकदा आपल्यात आली पाहिजे, जर ताकदा नसेल तर मरायला तयार राहा असा वटहुकूमच त्याने काढला होता. या सर्व व्यवस्थेला जो कोणी विरोध करेल त्याची हत्या निश्चित होती . सर्वांनी एकत्र राहायचे असाही नियम त्याच्या काळात होता. वैयक्तिक घर, मालकी हक्क या सर्व गोष्टी पूर्णपणे नामशेष झाल्या होत्या. कंबोडियाचे चलन पूर्णपणे नष्ट झाले होते. पुरूषा वेगळ्या झोपड्यांमध्ये तर स्त्रिया वेगळ्या झोपड्यांमध्ये झोपायच्या. हे सर्व सतत ४ वर्षे करत असताना शिकलेले व शहरात राहणारे लोक सापडले की त्यांच्या हत्या सुरुच होत्या. हत्या करण्यासाठी बंदुकींच्या गोळ्यांचा वापर करावा लागत होता. बंदुकींच्या

गोळ्या महाग (पिकवलेल्या भाताच्या बदल्यात चायनाकडून शस्त्रास्त्र मिळत असत) पडत असल्याने मिळेल त्या हत्याराने लोकांना मारा असा आदेशाच त्याने काढला. ख्मेर रूजच्या सैनिकांनी कुदळ, फावडे, सुरे यांच्या साहाय्याने हत्या करण्यास सुरुवात केली. आज ही हत्यारे फुनाम पेन्हमधल्या genocide संग्रहालयात पाहावयास मिळतात. सहसा या सर्व हत्या killing fields मध्ये केल्या जात.

फुनाम पेन्हमधल्या १ एकरच्या killing field मध्ये मी जेव्हा गेलो तेव्हा मी घाबरलोच. कारण एरवी स्मशानभूमीतदेखील जायचे म्हणजे आपण थोडा विचार करतो ही स्मशानभूमी २०००० प्रेतांची आहे व या सर्व लोकांना येथे फक्त ४ च अमानुषपणे ठार मारण्यात आले आहे. या killing field मध्ये एकूण १३ spots आहेत . प्रत्येक स्पॉटवर जाऊन आपल्याकडे असलेल्या रिमोट तो स्पॉट नंबर प्रेस केला तर त्या स्पॉटची रनिंग कॉमेंटरी सुरु होते. प्रत्येक स्पॉटवर काय व्हायच ते लगेच कळते. तेथे असलेले spots खालीलप्रमाणे :

१ - **ट्रक Stop** (ज्या लोकांची हत्या करायची आहे त्या लोकांना ट्रकमध्ये भरून आणायचे व या स्पॉटवर उतरवायचे)

२- **Dark And Gloomy Detention रूम** (सहसा लोकांना दिवसा आणलं जायचं व रात्री मारलं जायचं. दिवसभर त्यांना या अंधाऱ्या खोलीत डांबून ठेवलं जायचं)

३- **Working Office** ( येथे जे लोक मारण्यात येणार आहेत त्यांचं record ठेवलं जायचं )

४ - **Chemical Substance Storage Room** (ठार मारलेल्याप्रेताच्या वास येऊ नये म्हणून त्यांच्यावर DDT फवारलं जायचं. ते DDT येथे store केलेलं असायचं)

५ - **MAss grave** (४५० मृतदेह) खड्डा जेथे ४५० मृत. देहांचे सांगाडे सापडले

६- **MAss Grave २** (१६६ मृतदेह ) खड्डा जेथे १६६ म१त. देहांचे सांगाडे सापडले

७ - **MAss grave ३** (२०० मृतदेह) खड्डा जेथे २०० मृत. देहांचे सांगाडे सापडले

८ - **Walk on the horror lake** (डबकं ज्यात काही प्रेतं फेकली गेली. यातली बरीच प्रेतं बाहेर काढलीच नाहीत. जी तरंगली त्यांची संख्या २००च्या वर

९ - **Glass Box 1** (ठार मारण्यात आलेल्या लोकांचे कपडे)

१० - **Glass Box 2 spirit house** (ठार मारण्यात आलेल्या लोकांचे कपडे)

११- **Chinese ceremonial kiosk**

१२ - **Survivor Stories**

१३ - **MAss Grave ४** (१५० मृतदेहांचे सांगाडे, ज्यांचे मुंडके नव्हते)



**MAss Grave जेथे १५० मृतदेहांचे सांगाडे विना धडाचे सापडले** →

१४ - **Killing Tree**



**हृदय हेलावून टाकणारा Killing Tree**

Killing field मधली सर्वांत हृदय हेलावणारी जागा. इथे उभं राहिल्यानंतर माणूस कुठल्या नीच पातळीला जाऊ शकतो याचा अनुभव येतो. तान्ही बाळं व एक ते २ वर्षांपर्यंतच्या मुलामुलींना मारण्यासाठी या झाडाच्या खोडाचा उपयोग केला. लहानग्या निष्पाप जिवाला मारण्याचे पोल पॉटचे म्हणये म्हणचे कारण असे होते की जर कुटुंबातल्या एका व्यक्तीला मारलं असेल तर ते संपूर्ण कुटुंब संपवलं पाहिजे. कुटुंबातली छोटी मुले सोडून दिली तर ती भविष्यात बदला घेतील. पोल पॉट म्हणयचा, "If you want to pick up the grass, take it out with the roots". या झाडासमोर कॉमेंटरी ऐकताना मी नकळतच रडायला लागलो. आत्तापर्यंत १००

च्या वर छोट्या मुलांच्या मृतदेहांचे सांगाडे येथे सापडले आहेत. ख्मेर रुजच्या सौन्यातील एका अधिकाऱ्याने २००९ मध्ये कोर्टात या हत्येची जबाबदारी स्वीकारली. त्याची कबुली कॉमेंटरीमध्ये ऐकता येते. ती ऐकल्यावर तो अधिकारी माणूस असेल का हा प्रश्न मनात येतो. माझे रडणे येथे थांबायलाच तयार नव्हते. एका पर्यटकाने मला सावरले.

१७ - **MagicTree**

या झाडाचं नाव magic का आहे हे कळलंच नाही. ख्मेर रूजचे सैन्य रात्री जेव्हा हत्या करायचे त्या वेळेस gloomy dark room (Spot No.1) मध्ये डांबून ठेवलेल्यांना ओरडण्याचा आवाज ऐकू येऊ नये म्हणून या झाडावर स्पीकर्स टांगून ख्मेर रूजच्या वैभवशाली परंपरेचे गीत मोठ्या आवाजात वाजवले जायचे. ते गीत जेव्हा कॉमेंटरीमध्ये सुरू झाले तेव्हा माझ्या छातीत धडकीच भरली व मी कॉमेंटरी बंद करून त्या झाडासामोरून निघून गेलो.

१८ - **Memorial Stupa**



**मेमोरिअल स्तूपामध्ये ठेवण्यात आलेले मृतदेहांचे अवशेष**

शेवटचा स्पॉट म्हणजे Memorial Stupa येथे उत्खननात सापडलेले मानवी सांगाडे, कवट्या, हाडे एका काचेच्या उंच rak मध्ये पुरूष, स्त्रिया, लहान मुले, तसेच त्यांना ज्या प्रकारे मारले गेले म्हणजे मेंदूच्या मध्यावर, डाव्या बाजूला, उजव्या बाजूला असे विविध प्रकारे वर्गीकरण करून ठेवले आहेत. सध्या UN च्या सर्वेक्षणानुसार त्या ४ वर्षांत प्रत्येक ४ कंबोडियन नागरिकांपैकी २ कंबोडियन मारले गेले होते.

अशी भयानक killing field बघून झाल्यावर मी पोल पॉटचा secret prison बघायला निघालो, जेथे कैद्यांचा अमानुष पद्धतीने छळ केला जायचा व नंतर त्यांना killing field ला पाठविले जायचे. पण जाताना एकच विचार मनात येत होता की आपल्याच देशातील लोकांचा बळी घेणाऱ्या ख्मेर रूजच्या सैनिकांची माणुसकी ४ वर्षांसाठी एवढ्या नीच पातळीला कशी काय जाऊ शकते? मारल्या गेलेल्या सर्व लोकांचा दोष फक्त इतकाच होता की ते एकतर शिकलेले वा शहरात राहणारे होते. माझ्या आत्तापर्यंतच्या वाचनाने माझे असे मत होते की जर्मनीच्या हिटलरने केलेला नरसंहार हा आत्तापर्यंत माहीत असलेला सर्वांत मोठा नरसंहार होता. पण कंबोडियामध्ये ख्मेर रूजने ४ वर्षांत केलेला नरसंहार हा हिटलरने केलेले नरसंहारापेक्षा कैक पटीने मोठा व भीषण होता. तसेच ह्या नरसंहारात ज्यांनी मारलं व जे मेले ते एकाच देशाचे नागरिक होते. त्यांचा धर्म वेगळा नव्हता, भाषा वेगळी नव्हती, त्वचेचा रंग वेगळा नव्हता, संस्कृतीही वेगळी नव्हती व त्यांचा देशही वेगळा नव्हता. फरक एवढाच की, जे मारले गेले ते शिकलेले होते व मारणारे न शिकलेले. मी व्यवसायाने शिक्षक असूनही पहिल्यांदाच मला असे वाटले की शिक्षित झाल्यानेसुद्धा आपला जीव जाऊ शकतो. हा विचारही मनात तरळून गेला की कंबोडियातील लोक शिकले नसते तर कदाचित वाचलेसुद्धा असते. आयुष्यात पहिल्यांदाच मला लोकांच्या अशिक्षित असण्याचा फायदा जाणवत होता.



**Killing Field मध्ये जागोजागी असे बोर्डस लावण्यात आलेले आहेत. आजही तेथे जमिनीतून पावसामुळे हाडे वर येत असतात.**

**संदीप कुलकर्णी**

●●●

# परिसर वार्ता

- संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

मुलांमध्ये असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध स्पर्धा घेतल्या जातात. मुले अतिशय हिरिरीने यांत भाग घेऊन बक्षिसे पटकावतात. याचे उदाहरण म्हणजे स्त्री कल्याण संघटनेतर्फे घेण्यात आलेल्या अभिनयगीत स्पर्धेत कु. स्वरूप संजय लांजेकर याने पहिल्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले.

आकृती कला मंचातर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत ६ मुलांना व हस्ताक्षर स्पर्धेत २ मुलांना सुवर्णपदके व प्रशस्तिपत्रके मिळाली. तर सन २०१४ चा कलागौरव पुरस्कार कु. गौरी पाटील ह्या विद्यार्थिनीला मिळाला. पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विदुला वैद्य ह्यांना हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

बाह्यास्पर्धांव्यतिरिक्त शालेय क्रीडामहोत्सवात मुले भाग घेतात. यंदा बादलीत बॉल टाकणे, लगोरी रचणे, रिंगमधून बॉल टाकणे इ. स्पर्धांचे आयोजन केले होते.

मुलांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळावा म्हणून वार्षिक स्नेहसंमेलन दि. १६/१२/२०१४ रोजी आयोजित केले होते. या स्नेहसंमेलनाचे अध्यक्षपद ''सौभाग्यवती सुमेधा बेडेकर'' यांनी भूषविले होते. या कार्यक्रमाची छोटी पाहुणी होती कु. वल्लरी कांबळे.

हिंदी ही आपली राष्ट्रभाषा म्हणून भारत सरकारने तिला मान्यता दिली आहे. उपन्यासकार-प्रेमचंदजी, भगवतीशरण वर्मा इ. दिग्गज लेखकच कवींनी ही भाषा समृद्ध केली आहे. लहान लहान मुलांना तर हिंदी गाणी सहज तोंडपाठ होतात. तर याच आपल्या हिंदी भाषेच्या प्रेमापोटी हिंदी बालगीते सादर करण्यात आली. या वर्षीचा स्नेहसंमेलनाचा विषय होता ''हिंदी बालगीते'' यांत लकडी की काठी, नन्हा मुन्ना राही हूँ-देश का सिपाही हूँ, नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी में क्या है, मैंने कहा फूलोंसे, बम बम बोले, हमको मनकी शक्ती देना अशी विविध गाणी सादर करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे अल्पोपहार म्हणून मुलांना दाबेली व जिलबी देण्यात आली. मुलांनी अतिशय आवडीने याचा आस्वाद घेतला.

शुक्रवार दि. २७/२/२०१५ रोजी पूर्व प्राथमिक विभागाची 'पुष्करमेला' येथे सहल नेण्यात आली. मुलांनी सहलीचा मनमुराद आनंद घेतला.

बुधवार दि. ४/३/२०१५ रोजी मोठ्या शिशूच्या मुलांची होळी डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या प्रांगणात साजरी करण्यात आली. एकूण १०० मुले हजर होती. रात्री ९.०० वाजता आपल्या शाळेचा शिपाई श्री. सुरेश पवार याने होळी प्रज्वलित केली. मुलांनी वडापाव व केकचा आस्वाद घेतला. रात्री ९.३० वाजता 'होळी रे होळी, पुरणाची पोळी' असे म्हणत मुले आनंदात आपापल्या घरी गेली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०१५ रोजी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ व शाळेचा वार्षिक अंक पारिजातक प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. अमित पाटील (माजी विद्यार्थी) व 'पारिजातक' प्रकाशनासाठी आपल्या शाळेचे माजी विद्यार्थी मा. श्री. सुशांत चौधरी यांना बोलावले होते.

या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून साहाय्यक

पोलीस आयुक्त मा. श्री. व्ही. व्ही. लक्ष्मीनारायण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाचे सभासद मा. श्री. अनिरुद्ध जोशी यांनी भूषविले.

दि. २८ फेब्रुवारी २०१५ चा विज्ञान दिन २७ फेब्रुवारीला साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपल्या कलपकतेनुसार प्रकल्प तयार कूले होते. विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा. श्री. विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच मा. श्री. रसाळ उपस्थित होते. प्रकल्पामध्ये तयार केलेल्या प्रतिकृतीचे निरीक्षण करून उत्तम प्रतिकृतीची निवड करण्यात आली. सौ. कुमावत मलिये व सौ. अडसुळे यांनी निरीक्षण (पर्यवेक्षण) केले.

**दि. २७ फेब्रुवारी २०१५ मराठी दिन**

दि. २ मार्च २०१५ रोजी मराठी दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी ग्रंथदिंडी काढण्यात आली. ग्रंथाचे पूजन मा. श्रीमती विदुला वैद्य, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका यांच्या हस्ते झाले. मा. मुख्या. श्री. गवई, उपमुख्या. श्री. गढरी व पर्यवेक्षक श्री. पांचाळ यांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी शाळेच्या प्रशालेच्या आवारातून काढण्यात आली. विविध कार्यक्रम घेण्यात आले.

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग**

दिनांक २७ फेब्रुवारी २०१५ रोजी मराठी दिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी मराठीतून प्रतिज्ञा, प्रार्थना व बातम्या सांगितल्या तसेच कविता म्हटल्या, गोष्ट सांगितली व कोडी घातली.

विद्यार्थ्यांनी वर्गात मराठी भाषेवर विविध तक्ते लावले. ह्या दिवशी वर्गातील फळ्यावर पटसंख्या व सुविचार मराठीत लिहिला. सर्व शिक्षक व मुलांनी मराठीतून संवाद साधला.

**होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१४-२०१५ चे निकाल :**

इ. ६वी - कु. वरद लेले - रौप्यपदक

इ. ९ वी - कु. प्रज्ञा घारपुरे - रौप्यपदक

कु. सानिका गोरे - कास्यपदक

**रामायण कथा स्पर्धा २०१४-२०१५ : १००% निकाल**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी - २५

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी - २५

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| १९ | ४ | १ | १ |

विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे -

| विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|
| १) साशा गोरे | ९७/१०० |
| २) सुरभी लेले | ९७/१०० |

**मुंबई ग्राहक मंच आयोजित आंतरशालेय नाट्य स्पर्धेचा निकाल :**

आमच्या विद्यार्थ्यांनी 'गोंधळी राजाची सफळ कहाणी' हे नाटक सादर केले व खालील पारितोषिके मिळवली.

उत्कृष्ट अभिनेता - कु. श्रेयस जोशी

उत्कृष्ट लेखक - सौ. वीणा जोशी

**२०१४-२०१५ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल :**

राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :

**बालवीर** : १) कु. सोहम बंडागळे २) कु. तरंग डोंगा
३) कु. संस्कार चव्हाण ४) कु. श्रेयस शिंदे
५) कु. अथर्व चुबे ६) कु. व्रज मेहता
७) कु. हार्दिक सावंत ८) कु. चिराग पाटील
९) कु. अभय शिर्के

घरच्या आईची किंमत कळायला स्वत: घरा बाहेर पडावं लागतं!.

**क्रिकेट**

कु. सोहम बंडागळे व कु. हार्दिक सावंत यांना साळगावकर स्पोर्टस् आयोजित गोविंद पाटील आंतरशालेय U१३ क्रिकेट स्पर्धेत 'सर्वोत्कृष्ट खेळाडू' म्हणून पारितोषिक मिळाले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### 'गांधी रिसर्च फाउंडेशन'च्या परीक्षेमध्ये बांदोडकर महाविद्यालयाला दोन सुवर्णपदके

गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव आयोजित 'गांधी विचार संस्कार परीक्षा' २०१५ मध्ये बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा कु. सोहम बारी हा अकरावी इयत्तेतील विद्यार्थी राज्यस्तरातून सुवर्णपदक मिळवून प्रथम आला. तसेच पदवी महाविद्यालयातून कु. सुतार ही द्वितीय वर्ष विज्ञानाची विद्यार्थिनी उच्च वयोगटातून सुवर्णपदक मिळवून पहिली आली.

### महाराष्ट्र शासनाच्या जादूटोणा विरोधी कायद्याबद्दल जनजागृती मोहिमेत बांदोडकर महाविद्यालयाचा सहभाग

महाराष्ट्र शासनाच्या 'सामजिक न्याय' व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने जादूटोणा विरोधी कायद्याबद्दल जनजागृती मोहीम दि. ७ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी ६:०० ते ९:०० या वेळेत सेंट्रल मैदान, ठाणे. येथे आयोजित केली होती. या मोहिमेमध्ये बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाकडून उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला गेला. महाविद्यालयाच्या वतीने प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

### 'जैवमहितीतंत्रज्ञान आणि वर्गीकरणातील नवीन व बदलते प्रवाह' या विषयावर बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

'NETBT 2015' म्हणजेच (New and Emerging Trends in Bioinformatics and Taxonomy) या सर्वांत प्रगत संशोधनावर भर असणाऱ्या विज्ञान शाखेतील नवीन प्रवाहांवर एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात दि. १४ व १५ जानेवारी रोजी करण्यात आले. या परिषदेत आपले संशोधनपर निबंध वाचण्यास देशभरातून संशोधक आले होते.

डॉ. पी.के रहमान, इंग्लंड, डेहराडूनचे डॉ. एच.जे. चौधरी, पुण्याच्या आधारकर संशोधनसंस्थेचे डॉ. सिंग गोवा विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. एफ. रॉड्रिग्ज, मुंबई प्रयोगशाळेचे संशोधक डॉ. शशी मेनन तसेच पिरामल एटरप्राइझेस, मुंबईचे डॉ. सुनीलकुमार देशमुख, रासायनिक प्रयोगशाळेचे प्रमुख डॉ. श्रीनिवास. त्याचप्रमाणे ख्यातकीर्त वनस्पतितज्ज्ञ डॉ. अल्मेडा व डॉ. कुलकर्णी या व अशा बऱ्याच संशोधकांच्या आणि शास्त्रज्ञांची संशोधनात्मक ज्ञानाची मेजवानीच या दोन दिवसांमध्ये विज्ञानाच्या अभ्यासकांना मिळाली. आणि या नव्या प्रवाहातील नव्या संशोधनाची ओळखही झाली.

विज्ञानातील संशोधनामध्ये अशा परिषदेतून काहीतरी नवीन व पर्यावरणासाठी उपयुक्त असे हाती लागेल व विज्ञानातील नव्या प्रवाहांचीही माहिती मिळेल असे आश्वासन या वेळी या परिषदेच्या संयोजक व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, सहनिमंत्रक डॉ. मुळगावकर व कार्यकारी सचिव डॉ. मोझेस कोलेट यांनी व्यक्त केले.

### बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात दीक्षांत समारंभ संपन्न

विद्याप्रसारक मंडळाच्या बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात दि.२ फेब्रुवारी २०१५ रोजी दुपारी २ वाजता दीक्षांत समारंभ संपन्न झाला. मुंबई विद्यापीठाच्या निर्णयानुसार या वर्षापासून प्रत्येक महाविद्यालयाने आपापल्या विद्यार्थ्यांसाठीचा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्याच दिवशी दुपारी आपल्या महाविद्यालयात आयोजित करावयाचा आहे.

अपयशाच्या कठीण खडकाखालीच यशाच्या पाण्याचा झरा असतो.

ह्या वर्षी अपवाद म्हणून २ फेब्रुवारी रोजी आयोजित केला तरी चालेल असे विद्यापीठाने कळविले होते. त्यानुसार सदर समारंभ दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आला. या वेळी महाविद्यालयातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांपैकी तब्बल २५० विद्यार्थी उपस्थित राहिले. त्या सर्वांना पदवी प्रदान करण्यात आली. काही कारणाने उपस्थित राहू न शकलेल्या विद्यार्थ्यांना ही पदवी महाविद्यालयातून नंतर देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सकाळी आयोजिलेल्या संयुक्त दीक्षांत समारंभात केलेले दीक्षांत भाषण पुनःप्रसारित करण्यांत आले. या भाषणातून डॉक्टर बेडेकरांनी विद्यार्थ्यांनी सुजाण व जागरूक नागरिक बनावे असे आवाहन केले. प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी आपल्या भाषणात आपल्या महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल होईल असे कार्य करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

प्रथमच महाविद्यालय पातळीवर दीक्षांत सोहळा संपन्न होत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पूर्वी विद्यार्थ्यांना या दीक्षांत सोहळ्यासाठी वाट बघावी लागायची आणि त्यांतही बऱ्याच विद्यार्थ्यांना ही पदवी पोस्टाने प्राप्त व्हायची. मात्र आता प्रत्येकाला या सोहळ्यात सहभागी होऊन सन्मानपूर्वक पदवी प्रमाणपत्र घेता आल्याने आनंद झाला होता.

दीक्षांत समारंभाचे गांभीर्य व पावित्त्य राखून विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र ग्रहण केले व उत्साहाने या संस्मरणीय क्षणाची छायाचित्रेही काढून घेतली.

### बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने घडविला साहित्य सहवास

बांदोडकर महाविद्यालयाच्या साहित्य सहवास आणि भाषा मंडळ यांनी 'Friendship' (मैत्री) या विषयावर एका बहारदार कार्यक्रमाचे आयोजन दि.१० फेब्रुवारी २०१५ रोजी ११ वाजता पतंजली सभागृहात केले होते.

Global village आणि विश्वबंधुत्व या संकल्पनेचा धागा पकडून ''मैत्री'' ही कुणीही, कुणाशीही करू शकते आणि ही मैत्रीची भावना निखळ व निरागस असू शकते. तिला कोणत्याही जातिधर्माचे, प्रांत, भाषेचे, देशसीमेचे बंधन नसते हा विचार विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपल्या कविता, चारोळ्या, शायरी व विचारांतून व्यक्त केला.

या कार्यक्रमात पदवी महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील २५० विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. विद्यार्थी व शिक्षकांनी आपल्या विविध मतांनी व विचारांनी या अगळ्या वेगळ्या कार्यक्रमाची शोभा वाढविली.

आजच्या Android च्या जगात मैत्री (Friendship) फक्त Sms, Whats app. Internet व E-mail पुरतीच मर्यादित राहिली आहे. त्यातून फक्त Forwarding चालू असते. तसे न होता विद्यार्थ्यांना एक चांगला विचारमंच मिळावा व आपल्या भावभावना शब्दांतून, कवितांमधून चुटक्यांमधून व्यक्त करता याव्यात याकरीता अशा कार्यक्रमांची आवश्यकता असते.

### समुद्र किनाऱ्यांवरील जैवविविधता

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि समाजसेवी संस्था 'होप' ठाणेच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ फेब्रुवारी २०१५ रोजी समुद्रकिनाऱ्यांलगतची जैवविविधता या विषयावर महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात सायंकाळी ५ वाजता डॉ. दीपक आपटे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

आपल्या पृथ्वीचा जवळजवळ ७०% भाग पाण्याने व्यापलेला आहे. त्यामुळे समुद्रात व समुद्रकिनारी

आढळणारे प्राणी, वनस्पती यांचे संवर्धन करणे जरुरीचे आहे. याच विषयावर डॉ. दीपक आपटे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. दीपक आपटे गेले अनेक वर्ष या विषयावर संशोधन करीत आहेत. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीमध्ये कार्यरत असलेल्या डॉ. दीपक दातार यांचा 'समुद्र जैवविविधता' यावर दांडगा अभ्यास आहे.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात नेहमी अशा व्याखानमालांचे आयोजन करण्यात येते. याआधी डॉ. शशी मेनन यांचे पक्षाचे गाणे ह्या विषयावर तसेच मकरंद जोशी, डॉ. राजू कसांबे आदी मान्यवरांची विविध विषयांवर व्याख्याने झाली आहेत.

**बांदोडकर महाविद्यालयात मराठी भाषेचा जागर**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध कवीनाटककार विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस उभ्या महाराष्ट्रात मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात २७ फेब्रु. २०१५ रोजी या राजभाषा दिनाचे औचित्य साधून एका भाषिक व सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सुप्रसिद्ध अभिनेत्री व सूत्रसंचालक सौ. संपदा जोगळेकर - कुलकर्णी व वृत्तनिवेदक श्री. मिलिंद भागवत हे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य विष्कारातून महाराष्ट्रातील विविध संस्कृती व लोकगीते यांची सरमन व तालबद्ध सफर घडविली आणि ना. धों. महानोर, जगदीश खेबूडकर, पी. सावळाराम, शाहीर विठ्ठल उमप, दादा कोंडके यांच्या लोकगीत, भावगीत व लावण्यांचा नजराणा सादर केला. संपूर्ण महाविद्यालयातून ३०० दर्शकांनी या मराठमोळ्या कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली.

अभिनेत्री सौ. संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी मराठी भाषेची ताकद, नवीन "Talk Book" ची संकल्पना व आपणच मराठीचा वापर करून प्रसार व प्रचार वाढवायला हवा असे नमूद केले आणि नृत्यलावणी यापेक्षा व्यवहारातील मराठी व पर्यायी मराठी शब्द यांतून मराठीचे संवर्धन व्हायला हवे असे सांगितले.

ABP माझा या वृत्तवाहिनीवरील सुप्रसिद्ध वृत्तनिवेदक श्री. मिलिंद भागवत यांनी एकमेकांशी संवाद करण्याची भाषा म्हणून आपण मराठी रूढ केली पाहिजे, तसेच whats app. वरील संदेशसुद्धा एकमेकांना पाठविताना मराठीचा वापर सक्षमपणे केला जाऊ शकतो असे सांगितले.

मराठी विभागप्रमुख प्रा. बिपिन धुमाळे यांच्या 'मराठीची स्थितिगती' या विषयावरील प्रास्ताविकाने सुरुवात झालेल्या या सोहळ्याची सांगता संगीतकार श्री. कौशल इनामदार यांच्या मराठी अभिमान गीताने झाली.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे कवी कुसुमाग्रजांच्या पुस्तकांचे व माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

**स्वातंत्र्यवीर सावरकरांची पुण्यतिथी**

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्ताने सावरकरांनी लिहिलेल्या काळे पाणी, माझी जन्मठेप, सहा सोनेरी पाने, शत्रूंच्या आठवणी, विज्ञान आणि निबंध, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, गांधी आणि गोंधळ, हिंदुत्व, हिंदू राष्ट्रदर्शन अशा दुर्मीळ पुस्तकांचे, कादंबऱ्या व आत्मचरित्रांचे प्रदर्शन २६ फेब्रुवारी रोजी भरवले गेले होते. तसेच सावरकरांच्या निवडक कवितांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. सावरकरांची लेखणी कणखर होती. त्यांनी लिहिलेले शब्द मनावर कमालीचा परिणाम करणारे आहेत. त्यामुळे आजच्या तरुण पिढीने सावरकरांचे लेखन एकदातरी वाचावे असा सल्ला प्राध्यापकांनी दिला.

**राष्टीय विज्ञान दिन**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे येथे

२८ फेब्रुवारी २०१५ रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' संशोधनपर उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. या वेळी डॉ. राजीव गुडे, निवृत्त वैज्ञानिक, ACTREC, खारघर हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्या कर्करोग (Cancer) या विषयावर सकाळी १०.१५ वाजता व्याख्यान आयोजित केले होते.

बांदोडकर महाविद्यालय गेल्या दोन वर्षांपासून J-BNB हे ऑनलाईंन नियतकालिक प्रकाशित करत आहे. या J-BNB च्या ३ऱ्या अंकाचे प्रकाशन राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून डॉ. राजीव गुडे यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांना संशोधनाची ओळख व्हावी या उद्देशाने लहान लहान संशोधन प्रकल्प महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येतात. या प्रकल्पांमधील संशोधनदेखील भित्ति पत्रकांच्या (Posters) स्वरूपात विद्यार्थ्यांनी सादर केले.

युनायटेड नेशन तर्फे २०१५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय मृदा वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. याकरता 'मृदा' या विषयावर एक पुस्तक प्रदर्शन व माहितीचे प्रदर्शन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे आयोजित करण्यात आले होते.

**एकदिवसीय राज्यस्तरीय महिला दिनांनिमित्त परिषद**

२१ व्या शतकात स्त्रिया विविध उच्च आणि आव्हानात्मक क्षेत्रांत ठसा उमटवत आहेत. स्त्रियांची वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगती कामगिरीदेखील उल्लेखनीय आहे. महिला दिनाचे औचित्य साधून बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे "Women in Science and Science for women" या विषयावर ७ मार्च २०१५ रोजी एक राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादाचे उद्घाटन सुमेधा बेडेकर याच्या हस्ते झाले. या परिसंवादाला सौ. ललिता दीक्षीत, डॉ. प्रतिभा येळणे आणि डॉ. अंजली पारसनीस या प्रवक्त्या म्हणून लाभल्या होत्या.

या परिसंवादात सौ. सुमेधा बेडेकर यांचा स्त्री शक्ती व सौ. ललिता दीक्षीत आणि प्रतिभा येळणे यांचा "Yoga in relation to women health" या विषयावर परिसंवाद झाला. तसेच डॉ. अंजली पारसनीस यांनी TERI Diet & Gynecological Problems of women या विषयावर व्याख्यान दिले.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्त्रियांच्या विविध समस्या, सामाजिक आव्हाने व उपाय स्त्रियांना होणारे विविध रोग व त्यांचे निदान स्त्रियासाठी वापरली जाणारी प्रसाधने या विषयांवर शोधनिबंध वाचण्यात आले.

**'अभिनयाचा शहेनशहा अमिताभ बच्चन यांनी बांदोडकर कॉलेजच्या विद्यार्थ्याचे केले कौतुक'**

ठाण्यात गडकरी रंगायतनमध्ये ठाणे वाहतूक पोलिसांनी मराठी भाषा दिनाच्या सायंकाळी आयोजित केलेल्या एका भव्य व देखण्या कार्यक्रमात अभिनयाचा शहेनशहा व पद्मविभूषण श्री. अमिताभ बच्चन यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी कु. ओमकार मुळये याचे त्याच्या अदभुत कलेबद्दल कौतुक केले.

वाहतुकीचे नियम पालन व रस्ता सुरक्षा अभियान गेले १५ दिवस चालू आहे. त्याचा एक भाग म्हणून पोलीस उपायुक्त डॉ. रश्मी करंदीकर यांनी या भव्य सभारंभाचे आयोजन केले. यावेळी ज्या महाविद्यालयांनी रस्ता सुरक्षा अभियानात आपला सहभाग दर्शविला. अशा निवडक महाविद्यालयांमध्ये बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ओमकार मुळये याला अमिताभजींच्या हस्ते हेल्मेट प्रदान करण्यात आले. तेव्हा या विद्यार्थ्याने आपले उलट लिहिण्याचे कसब वापरून (Mirror Image) बच्चन यांना एक भेटपत्र अर्पण केले. त्यामध्ये श्री. हरिवंशराय बच्चन यांची प्रसिद्ध कविता 'मधुशाला' ही उलटया हस्ताक्षरांमध्ये लिहीली होती. त्या कवितेचे प्रतिबिंब वाचतानाचा अनुभव अद्‌भुत आहे असे उद्‌गार

श्री. बच्चन यांनी काढले. तसेच ही कलाही अदभुत आहे, हे कसे काय जमते? अशी विचारणाही या वेळी अमिताभजींनी या विद्यार्थ्याकडे केली.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**पदवी प्रदान सोहळा - २ फेब्रुवारी २०१५**

व्ही. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालयाने दिनांक २ फेब्रुवारी २०१५ रोजी पदवी प्रदान समारंभ आयोजित करण्याचे ठरविले. दिनांक २२ जानेवारी २०१५ रोजी BGL ची तर LL.B. चे १५९ पदवी पत्रे महाविद्यालयाला मिळाले सदर समारंभाची कल्पना मुंबई विद्यापीठाला आगोदरच देण्यात आली.

जे विद्यार्थी सन २०१४ मध्ये द्वितीय विधी उत्तीर्ण झाले त्यांचे व पुर्णतपासनीमध्ये ज्यांनी अर्ज केले होते त्या तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांची पदवीपत्रे महाविद्यालयास प्राप्त झाली नाहीत. यामुळे अनेक विद्यार्थी, जे त्यांच्या पदवीची वाट बघत होते ते नाराज झाले.

सदर पदवी समारंभ दोन वेगवेगळ्या सत्रांमध्ये घेण्यात आला. पहिले सत्र सकाळी १०.४० वाजता परिसरातील सभागृहामध्ये घेण्यात आले. यामध्ये विधी, कला, विज्ञान व वाणिज्य अशा सर्व शाखांचे विद्यार्थी हजर होते. या वेळी महाविद्यालयाचे एकूण ४७ पैकी ४२ विद्यार्थी हजर होते. दुसऱ्या सत्रामध्ये एकूण १७१ विद्यार्थ्यांना बोलविले होते. पण फक्त १६ विद्यार्थीच हजर होते.

सदर पदवी समारंभ हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी सर्व विद्यार्थी गणवेशामध्ये हजर होते. सभागृहामध्ये रांगोळी काढण्यात आली होती. यावेळी BGL पदवी प्राप्त न झालेले विद्यार्थी नाराज होते. त्यांची पदवी पत्रे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत प्राप्त झाली नाहीत.

**मराठी दिन**

दर वर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयाने मराठी राजभाषा दिन साजरा करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे दि. ७.२.२०१५ रोजी तशी सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. या वेळी विविध स्पर्धेचे आयोजन केले गेले.

१. कवितालेखन स्पर्धा : दुपारी ४ ते सायं ५.३०
२. वक्तृत्व स्पर्धा : सायं ५.४० ते ७.२०
३. पथनाट्य स्पर्धा : सायं ७.३० ते ८.१५

या वेळी पथनाट्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, परंतु सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भाग न घेतल्यामुळे ती रद्द करण्यात आली.

वक्तृत्व स्पर्धेच्या सुरुवातीला आमच्या प्रभारी प्राचार्या यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना असे म्हटले की जशी इंग्रजी भाषा झपाट्याने वाढत आहे त्याचप्रमाणे मराठी भाषेचा विसर कोणाला पडू नये व तिचाही विकास ह्याच गतीने व्हावा. मराठी भाषेच्या प्रगतीसाठी त्यांनी सर्वांनी सहयोग देण्याची विनंती केली व एक मराठी कविता सादर केली.

बोलतो मराठी, ऐकतो मराठी
जाणतो मराठी, मानतो मराठी
आमच्या मनामनात दंगते मराठी
आमच्या रगारगात रंगते मराठी
आमच्या उराउरात स्पंदते मराठी
आमच्या नसानसात नाचते मराठी
आमच्या मुलांमुलीत खेळते मराठी
आमच्या घराघरांत वाढते मराठी
बोलतो मराठी मानतो मराठी
दंगते मराठी, रंगते मराठी
स्पंदते मराठी, स्पर्शते मराठी
गुंजते मराठी, गर्जते मराठी
गर्जते मराठी, गर्जते मराठी

**मराठी गायन स्पर्धा**

या वेळी मराठी गायन स्पर्धेचे आयोजन केले गेले होते. विद्यार्थ्यानी विविध मराठी गीते सादर केली. परीक्षक म्हणून ॲड.गणेश बद्री व ॲड. प्रॉस्पर डिसूझा होते. या स्पर्धेमध्ये दिनेश गरुड प्रथम यांनी सिद्धेश वैद्य यांनी द्वितीय व धर्मेश जैनतृतीय बक्षीस मिळवले.

**वक्तृत्व स्पर्धा**

या वेळी 'भारतासमोरील आव्हाने' व 'स्त्रियांची सुरक्षितता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले गेले होते. या वेळी परीक्षक म्हणून ॲड. गणेश बद्री व ॲड.आशा दातार मॅडम यांनी काम पाहिले. यामध्ये वर्षा पाटोळे यांनी प्रथम. संगीता रोकडे यांनी द्वितीय तर दिगंबर खरात यांनी तृतीय बक्षीस मिळविले.

**कवितालेखन स्पर्धा**

या वेळी 'न्यायालय', 'राग', 'आशा', 'शिक्षा' विषयावर कवितालेखनाची स्पर्धा आयोजित केली गेली होती. यामध्येदेखील अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेऊन कविता सादर केल्या.

या वेळी अनेक विद्यार्थ्यांनी 'मी आणि माझे विधी महाविद्यायलय' या विषयावर मराठीमधुन मनोगत सादर केले.

तृर्तीय विधी वर्षाचे श्री.अनिल सूर्यवंशी यानी सुत्रसंचालन केले तर प्रा.विनोद वाघ यांनी बक्षिस जाहीर केली कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांसाठी चहाची व्यवस्था करण्यात आली होती.

**१० फेब्रुवारी जे. सी. विधी महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा**

जे. सी. विधी महाविद्यालयात आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आमची विद्यार्थिनी रंजनी कृष्णन (तृतीय वर्ष विधी) हिने द्वितीय क्रमांक पटकावला. ''अंधश्रद्धा निर्मूलन कायदा, या विषयावर तिने भाष्य केले.

**न्यु लॉ कॉलेज अनुराग स्पर्धा**

आमच्या विद्यार्थ्यांनी न्यू लॉ कॉलेज, माटुंगा ह्यांनी आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

क्विझ - अंकिता पवार व सौमिल रामबिया

स्पेलबी - अंकिता पवार

मूट कोर्ट - राहुल पै व सौमिल रामबिया

**के. इ. एस. लॉ कॉलेज स्पर्धा**

आमचे विद्यार्थी श्री. मनीष काळे, श्री. राहुल पै, हेमाली पाटील व प्रज्ञा शिंदे ह्यांनी के. इ. एस. विधी महाविद्यालयद्वारे आयोजित करण्यात आलेल्या प्रोफेशनल ॲडवोकसी, ब्रेन टिझर, लॉ हंट, पोस्टर स्पर्धा इ. विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

**२० फेब्रुवारी वाद-विवाद स्पर्धा**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेत आमचे विद्यार्थी श्री. अभिजित सावंत (तृतीय वर्ष) व मिस. गौरी हलदावणकर (प्रथम वर्ष) ह्यांनी सहभाग घेतला. त्यांनी 'Social Media' ह्या विषयावर आपले मत मांडले.

**10th Dr. V. N. Bedekar Mencorial Legal Debate**

दिनांक २० फेब्रुवारी रोजी स्वर्गीय डॉ. श्री. वा. ना. बेडेकर ह्यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून आमच्या महाविद्यालयातर्फे मुंबई विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ४० महाविद्यालयांना ह्या स्पर्धेचे निमंत्रण पाठविण्यात आले होते. वेगवेगळ्या महाविद्यालयांमधून एकूण १२ टीम्सनी ह्यांत सहभाग घेतला. स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते.

**Legal Debate Competition**

**Topics**

1. Replacing the Collegium System by Judicial Appointments commission in violative of the Basic Structure of Indian Constitution.
2. Prostitution should not be legalized in India.
3. A.370 of Indian Constitution should be scrapped.

**उद्घाटन व परीक्षक**

वरिष्ठ वकील श्री. श्रीकांत गडकरी व श्री. सचिन रेघे ह्यांनी ह्या कार्यक्रमाचे परीक्षक पद भूषविले. अर्धवेळ शिक्षिका सौ. हेतल मिशेरी ह्यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. विद्या प्रसारक मंडळाचे सहसचिव श्री. जे. एन. कयाल ह्यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कौशल्य विकास ह्याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

**स्पर्धा**

सदर स्पर्धा ही इंग्रजी माध्यमात घेण्यात आली. प्रत्येक महाविद्यालयाला दोन विद्यार्थ्यांची एक टीम पाठविण्यास परवानगी देण्यात आली होती. सर्व विद्यार्थ्यांना १० मिनिटे वेळ देण्यात आली होती. ज्या महाविद्यालयांनी सहभाग घेतला व ज्या महाविद्यालयांनी पारितोषिक पटकाविले त्यांची नावे खालीलप्रमाणे

| **महाविद्यालयाचे नाव** | **टीमस चे नाव** | **बक्षिसे** |
|---|---|---|
| पी.इ.एस. विधी महाविद्यालय, दादर | महाराष्ट्र | |
| नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर | आंध्रप्रदेश | |
| डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नेरूळ | गोवा | |
| जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा | पंजाब | १ ले बेस्ट टीम |
| प्रवीण गांधी विधी महाविद्यालय, विलेपार्ले | जम्मू आणि काश्मीर | १ ले बेस्ट |
| व्ही.पी.एम. टी.एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे | दिल्ली | उत्तेजनार्थ |
| एम.एस. विधी महाविद्यालय, मुंब्रा | कर्नाटक | |
| जितेंद्र चौहान विधी महाविद्यालय, विलेपार्ले | हिमाचल प्रदेश | ३ रे बेस्ट टीम |
| न्यु लॉ महाविद्यालय, | केरळ | |
| विवेकानंद एज्युकेशन सोसायटी विधी | हरयाणा | |
| महाविद्यालय, चेंबूर | | |
| के. इ. एस. विधी महाविद्यालय, कांदिवली | झारखंड | |

वैयक्तिक पारितोषिके खालीलप्रमाणे

प्रथम : जेरुशा डिसूजा - प्रवीण गांधी विधी महाविद्यालय, विलेपार्ले

दुसरे : एकता सावंत - जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा

तिसरे : पूजा पुजारा - जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा

उत्तेजनार्थ : मनीष काळे - व्ही. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालय.

**विद्या प्रसारक मंडळ विधी महाविद्यालय लॉ टेस्ट स्पर्धा**

दिनांक २० फेब्रुवारी रोजी आमच्या महाविद्यालयातर्फे आंतरमहाविद्यालयीन लॉ टेस्ट स्पर्धा आयोजित करण्यात

आली होती. ह्यात ६० मार्कांची लेखी परीक्षा घेण्यात आली. आठ महाविद्यालयांतून सुमारे १५ विद्यार्थ्यांनी ह्यात सहभाग घेतला. ह्या स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे

प्रथम पारितोषिक : दर्शन शहा - प्रवीण गांधी विधी महाविद्यालय, विलेपार्ले

द्वितीय पारितोषिक : अभिति सावंत - व्ही. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे

तिसरे पारितोषिक : सरफरोज : पी. इ. एस. विधी महाविद्यालय, दादर

सदर स्पर्धेसाठी ग्रंथपाल मिस शीतल औताडे समन्वयक होत्या.

**राष्ट्रीय चर्चासत्र (E-Revolution : Challenges and opportunities)**

मॉडेल कॉलेज, डोंबिवली यांच्यातर्फे डोंबिवली जिमखाना सभागृह येथे दि. २३ फेब्रुवारी २०१५ रोजी E-Revolution : Challenges and opportunities या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चेतील उपविषय E-Commerce, E-Governance आणि E-Learning हे होते. प्रभारी-प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार ह्यांनी या चर्चासत्रात उपस्थित राहून Electronic Revolution : Opportunities Challenges in Legal Education या विषयावर पेपर सादर केला. उत्कृष्ट पेपर म्हणून सहा पेपरची निवड करण्यात आली. त्यात ह्या पेपरचा समावेश होता.

**आंतरराष्ट्रीय मूट-कोर्ट स्पर्धा**

आमच्या विद्यार्थ्यांनी दि. ४ ते ८ फेब्रुवारी २०१५ रोजी राष्ट्रीय विधी विद्यापीठ ह्यांच्याद्वारे अहमदाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या मूट कोर्ट स्पर्धेत सहभाग घेतला एकूण ५६ महाविद्यालयांनी ह्यात सहभाग घेतला होता. त्यात भारतातील व भारताबाहेरील महाविद्यालयांचा समावेश होता. खालील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आकाश वारंग, केतन दाबके, रश्मी जोशी

**पुणे मूट कोर्ट**

प्रथम लोकमान्य टिळक राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. ह्या स्पर्धेमध्ये आमचे प्रथम वर्ष विधीचे विद्यार्थी अर्चना कदम, अंकिता मुखर्जी, नीता संखे ह्यांनी सहभाग घेतला.

**नांदेड मूट कोर्ट स्पर्धा**

आमचे प्रथम वर्ष विधीचे विद्यार्थी श्यामजी चव्हाण, महेश वाघमारे, सर्वेश आठवले ह्यांनी या राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत सहभाग घेतला.

**C.W.E. विधी महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा, २८ फेब्रुवारी**

Child Welfare Centre विधी महाविद्यालय, मालाड ह्यांच्याद्वारे आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम वर्ष विधीची विद्यार्थिनी गौरी साखरदांडे हीने सहभाग घेतला. 'सामाजिक प्रसारमाध्यमे : कार्य आणि जबाबदारी', 'उच्च शिक्षणातील समस्या' व 'स्वच्छता अभियान : काळाची गरज' हे स्पर्धेचे विषय होते. उच्च शिक्षणातील समस्या ह्या विषयावर गौरी हिने भाष्य केले.

**लॉर्डस् विधी महाविद्यालय, गोरेगाव Lex-Loci**

लॉर्डस् विधी महाविद्यालयाने दि. २७ व २८ रोजी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयाने बाजी मारली. त्यांनी खालील बक्षिसे पटकाविली.

**चित्रपटसृष्टी मूट कोर्ट स्पर्धा**

मूट कोर्ट स्पर्धा - अभिजित सावंत, अंकिता मुखर्जी, केतन

बेस्ट मूटर स्पर्धा - अभिजित सावंत

उत्स्फूर्त वादविवाद स्पर्धा - अभिजित सावंत

बेस्ट संशोधक - केतन

मूट कोर्ट उत्तम कलाकार - चंद्रकांत सूर्यवंशी

ॲडोमेनिया - गौतम जैन

टर्न कोर्ट - सिद्धान्त नाईक व गौरी साखरदांडे

Legal Story Board - हिमाली पाटील, हर्षवर्धन खांबेटे

याखेरीज राहुल पै आणि रेश्मा शिंदे ह्यांनी Client Counceling तसेच अभिजित सावंत आणि हिमाली पाटील ह्यांनी Legal Quiz ह्या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. अभिजित सावंत ह्याने Letter to chief Justic ह्या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले.



**विक्रोळी राजर्षी शाहू विधी महाविद्यालय**

आमच्या विद्यार्थ्यांनी यामहाविद्यालयाद्वारे आयोजित केलेल्या सर्वच स्पर्धांमध्ये सहभाग घेतला व खालील बक्षिसे पटकाविली.

डिबेट स्पर्धा : सौमिल रामबिया द्वितीय
मनीष काळे पारितोषिक

स्पेलबी स्पर्धा : सौमिल रामबिया - प्रथम पारितोषिक

लॉ क्वीझ : सौमिल रामबिया द्वितीय
मनीष काळे पारितोषिक

कॅपशन स्पर्धा : मनीष काळे - द्वितीय पारितोषिक

**राष्ट्रीय चर्चासत्र**

'समाजाच्या जडणघडणीत असहकार संस्थेचा सहभाग' ह्या विषयावर आदर्श महाविद्यालय, बदलापूर ह्यांच्याद्वारे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात आमची प्रथम वर्ष विधीची विद्यार्थिनी अंकिता मुखर्जी हिने सहभाग घेतला व NGO's & the 'Consumer Protection Act : A Critical Evaluation' ह्या विषयावर पेपर सादर केला.

**सर्वोच्च न्यायालय अभ्यास भेट : २०१५**

व्ही. पी. एम्स. टी. एम. सी. विधी महाविद्यालयाने विधी विद्यार्थ्यांसाठी "सर्वोच्च न्यायालय अभ्यास भेट : २०१५" आयोजित केली होती. दिनांक १० ते १६ फेब्रुवारी २०१५ या दरम्यान ह्या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी प्रा. विनोद एच. वाघ, प्रा. अरुण गायकवाड व प्रा. हेतल मिशेरी यांनी सहभाग व पुढाकार घेऊन सदर भेट यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. महाविद्यालयाचे शिपाई श्री. त्रिभुवन हेदेखील मदतनीस म्हणून सोबत होते. एकूण ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. पैकी २८ मुली व १३ मुले होती. दिनांक १० फेब्रुवारीला मुंबईवहून आम्ही सर्व राजधानी एक्स्प्रेसने दिल्लीसाठी रवाना झालो. दिल्ली इथे करोलबाग या भागामध्ये टी जे एस रॉयल या हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

दिनांक १२ फेब्रुवारी रोजी मा. सर्वोच्च न्यायालयास भेट दिली. सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तीने सर्वोच्च प्रवेश करून सर्वोच्च न्यायालयाची प्रक्रिया समजून घेतली. सकाळी ११ ते सायं. ४ पर्यंत सर्व विद्यार्थी प्रक्रिया समजून घेत

होते. या वेळी प्रा. विनोद एच. वाघ, प्रा. अरुण गायकवाड व प्रा. हेतल मिशेरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. या वेळी फोन आतमध्ये घेऊन जाण्यास बंदी करण्यात आली होती.

दिनांक १३ फेब्रुवारी रोजी आम्ही सकाळी भारतीय संसदेला भेट दिली. या वेळेस राज्यसभा, लोकसभा व या ठिकाणी भेट दिली. तिथे असलेल्या गाईडने आम्हांला Central Hall एकूण संसदेविषयी माहिती दिली. दुपारी ३ वा. राष्ट्रपती भवनास भेट दिली. या वेळीदेखील तिथे असलेल्या गाईडने आम्हांस राष्ट्रपती भवनाचा एकूण इतिहास व इतर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी या वेळेस अनेक प्रश्न विचारले व त्या सर्व प्रश्नांना योग्य उत्तरे देण्यात आली.

भारतीय संसद व राष्ट्रपती भवन इथे प्रवेश करण्यापूर्वी आमच्याकडील मोबाईल फोन व इतर वस्तू जमा करण्यता आल्या होतया. यावरून तेथील सुरक्षेचा प्रश्न किती गंभीर आहे. याची कल्पना आली.

दिनांक १४ फेब्रुवारी रोजी आम्ही सर्व आग्रा इथे ताजमहाल बघण्यासाठी गेलो होतो. सकाळी ७ ते रात्री १० अशा एकूण १५ तासांची ही सहल फार लक्षणीय होती. दिनांक १५ फेब्रुवारी रोजी आम्ही सर्व सकाळी १० वाजता हॉटेलमधून बाहेर पडून राष्ट्रपती भवन येथील मुघल बाग बघण्यासाठी गेलो. सकाळी ११.३० ते दुपारी २ पर्यंत बाग बघून झाल्यानंतर आम्ही सर्व दिल्ली रेल्वे स्टेशन इथे गेलो व सायं. ४.३० वाजता राजधानी एक्स्प्रेसने मुंबईसाठी निघालो. दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता आमही सर्व मुंबई इथे पोहोचलो व तेथून आपआपल्या घरी गेलो.

सदर भेटीदरम्यान रोज सकाळी ७.३० वाजता चहा-नाश्ता, दुपारी २ व सायं.९ वा. जेवण असा क्रम होता. या वेळी सर्व प्राध्यापकांनी आपापली भूमिका फार योग्यरीत्या पूर्ण केली. मदतनीस श्री. त्रिभुवन यांनी देखील वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे योग्य पालन करून, तसेच विद्यार्थ्यांना मदत करून सदर भेट यशस्वी होण्यासाठी मदत केली. विद्यार्थ्यांनीदेखील शिस्तीचे पालन करून सर्वांना चांगली साथ दिली.

या वेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी फार मोलाचे मार्गदर्शन केले. सदर भेटीसाठी आवश्यक सूचना व काळजी या सर्व बाबींबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाची ही दुसरी भेट आहे जी उत्तमरीत्या यशस्वी झाली. त्याबद्दल सर्वांचे फार आभार व धन्यवाद.

मुंबई विद्यापीठातर्फे नोव्हेंबर / डिसेंबर २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या विधी परीक्षांचे निकाल जाहीर झाले.

| | महाविद्यालय स्तरावर | विद्यापीठ स्तरावर |
|---|---|---|
| तृतीय वर्ष विधी सेमिस्टर-५ | ६०.७७% | ४२.६६% |
| द्वितीय वर्ष विधी सेमिस्टर-३ | ५५.४५% | ४१.७९% |
| प्रथम वर्ष विधी सेमिस्टर-१ | ३३.५२% | ३९.१२% |

## तंत्रनिकेतन

### जागतिक महिला दिनाचे आयोजन

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनतर्फे जागतिक महिला दिनाचे आयोजन दि. ७ मार्च २०१५ रोजी कात्यायन हॉल, दुसरा माळा (जोशी-बेडेकर कॉलेज ठाणे) येथे दुपारी १२.३० ते ५.०० या वेळेत केले होते. ISTE चॅप्टर आणि वुमेन ग्रीव्हन्स विभागाने या कार्यक्रमाची जबाबदारी घेतली होती. महाराष्ट्र टाइम्स हा मिडिया पार्टनर होता.

ॲड. सौ. स्मिता गायधनी (मुंबई हायकोर्ट) यांच्या भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे होणारे लैंगिक शोशण, त्या संदर्भात असलेले कायदे आणि त्या कायद्याची मदत कशा प्रकारे घ्यावी इत्यादी बाबतीत त्यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

सुजाता सोपारकर (मॅनेजिंग डायरेक्टर, इंटिग्रेटेड इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी प्रा. लि. ठाणे) यांनी स्त्री उद्योजकां विषयीचे आपले विचार मांडले. एखाद्या कारखाना स्त्रिया किती सक्षमतेने आणि व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून चालवू शकतात याबाबतची माहिती दिली.

ISTE चॅप्टर वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतन सचिव प्रा. सौ. गीताली इंगवले व वुमेन ग्रीव्हन्स विभागाच्या कार्याध्यक्ष प्रा. सौ. निशा वडेर यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. सदर कार्यक्रमास महिलांची उपस्थिती मोठ्या प्रामणात होती.

**Next Generation Electronics (NGE-2015) दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन,ठाणे यांच्या तर्फे १६ वी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद दि. १६ ते १७ जानेवारी २०१५ रोजी संपन्न झाली. इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानात झालेल्या बदलांचा आढावा हा त्या परिषदेचा मुख्य उद्देश होता. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात नवनवीन बदल/ निर्मिती होत असून पुढे आणखी काय बदल अपेक्षित असतील ह्या बाबतीत महत्त्वपूर्ण चर्चा मान्यवरांच्या, तज्ज्ञांच्या आणि उपस्थितांच्या उपस्थितीत घडून आली.

डॉ. एस. पी. एस. कुशवाह (ग्रुप डायरेक्टर, प्रोग्राम प्लॅनिंग अँड इव्हॅल्युएशन ग्रुप, IIRS डेहराडून, उत्तराखंड) यांचे शुभहस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. प्राचार्य दि. कृ. नायक (परिषद निमंत्रक) आणि प्रा. सौ. कीर्ती आगाशे (परिषद सचिव) यांनी परिषद आयोजनामागचा उद्देश स्पष्ट केला. उद्घाटन समारंभप्रसंगी श्री. अच्युत गोडबोले (मुख्य अतिथी, डायरेक्टर, सॉफ्ट-एक्सेल, मुंबई) डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) इत्यादी उपस्थित होते. प्रा. सौ. कीर्ती आगाशे यांच्या आभारप्रदर्शनाने उद्घाटनपर अधिवेशनाची सांगता झाली



**प्रोसिडिंग्ज प्रकाशन प्रसंगी डावीकडून प्रा. सौ. कीर्ती आगाशे (संघटन सचिव IE), श्री. अच्युत गोडबोले (डायरेक्टर सॉफ्ट-एक्सेल, मुंबई), डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे), डॉ. एस. पी. एस. कुशवाह (ग्रुप डायरेक्टर, PPEG, IIRS डेहराडून), प्रा. डह. के. नायक (निमंत्रक, प्राचार्य, वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे)**

.डॉ. धनंजय पंडित (डायरेक्टर, वॉटर रिर्सोसेस् ॲन्ड हे एन्व्हायर्न्मेंट) DHI (इंडिया) जल आणि पर्यावरण प्रा. लि.) यांच्या सादरीकरणाने तांत्रिक अधिवेशनाची सुरुवात झाली. आपल्या भाषणामध्ये त्यांनी इलेक्ट्रॉनिक्सची भूमिका पूरस्थितीविषयीचे संदेशवहन इत्यादींबाबतचे विचार स्पष्ट केले. पूर भाकितासाठीचे 'गणिती मॉडेल' त्यांनी स्पष्ट करून सांगितले. Ultrasonic Instrumentation विषयीचे सादरीकरण डॉ. व्ही. एच. पाटणकर (सायंटिफिक ऑफिसर, 'H' इलेक्ट्रॉनिक्स विभाग, BARC मुंबई) यांनी केले. त्यांनी BARC मध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे विविध प्रकारच्या Ultrasonic इन्स्ट्रुमेंटेशनविषयीची माहिती दिली. उदा. Ultrasonic Testing, Ultrasonic Imaging, System Software इत्यादी.

सौ. कल्पना उमराणी (सायंटिफिक ऑफिसर 'H' न्यूक्लिअर पॉवर कार्पोरेशन लि., पुणे) यांनी Qualification of electronic equipment for Nuclear applications संबंधीचे विचार स्पष्ट केले. डॉ. के. नागेश्वरी (INUP मॅनेजर, IIT-Mumbai) यांनी नवीन संशोधनाबद्दल महत्त्वपूर्ण विचार ऐकविले. सौ. कीर्ती आगाशे यांनाही IIT-BNF च्या संदर्भातील आपले अनुभव सांगितले. IIT-

BNF या सहाय्याने त्यासुद्धा Ph.D चे काम करीत आहेत.

प्रोफेसर जयंता मुखर्जी (इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग विभाग IIT- मुंबई) यांनी High Isolation Mixer for Wi-Fi application विषयीचे सादरीकरण केले.

पहिल्या दिवसाच्या शेवटच्या अधिवेशनात नवीन संशोधनात्मक विषय असलेल्या आणि विविध संस्थांतून आलेल्या सहभागकर्त्यांनी आपले सादरीकरण केले.

सादरकर्ते आणि विषय खालीलप्रमाणे -

| सादरकर्ते | विषय |
|---|---|
| • श्री. दिनोश शांताराम औटी | • Performance analysis of multicarrier system for under water acoustic communication |
| • श्री. विष्णुप्रिया शिंदे | • Coplanar implementation for dual band Microstrip patch antenna. |
| दुसरे अधिवेशन दि. १७ जानेवारी २०१५ या दिवशी सादर झाले. पेपर खालीलप्रमाणे - | |
| • डॉ. सौ. संगीता जोशी (प्रोफेसर ॲण्ड टेक अडव्हायजर, विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई) | • CMOS to Nano Technology |
| • श्री. ओमूकार जोशी (रिसर्च स्टुडंट, मेकॅनिकल इंजीनियरिंग ॲण्ड डिझाइन, ॲास्टन युनिव्हर्सिटी बर्मिंगहॅम यू. के.) | • UKIERI promotion and collaborative research activity of VPM's Polytechnic and Aston University. |
| • Prof. Geoff Stanley (प्राध्यापक व प्रमुख ग्रिफिथ स्कुल ऑफ इंजीनिअरिंग, ग्रिफिथ युनिव्हसिटी, ऑस्ट्रेलिया) | • Automatic Control of implantable rotary blood pumps. |
| • डॉ. प्रसाद कर्णिक (टेक्निकल डायरेक्टर, इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्लीप सायन्सेस, मुंबई) | • Role of electronics in sleep sciences. |
| • डॉ. मार्क प्रिन्स (लेक्चरर, मेकॅनिकल इंजीनिअरिंग ॲण्ड डिझाइन, ऑस्टन युनिव्हर्सिटी, बर्मिंगहॅम यु.के.) | • Particle Manipulation in Micro Fluidic systems for symchrotron imaging. |
| • डॉ. सौ. निशा सरवदे (VJTI मुंबई) | • Nanotechnology |
| • डॉ. सौ. माधवी ठाकूरदेसाई (सह्रहाय्यक प्राध्यापक, बिर्ला कॉलेज, कल्याण) | • Ion beam process in Micro and Nano electronics |
| • श्री. उदय सतीश मुथे (टेक्नोव्हा इंजीनिअरिंग सर्व्हिसेस) | • Opportunities in export |
| • स्मिता सुरवसे (बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स | • Effect of swift heavy Ion irradiation on |

| | |
|---|---|
| ॲण्ड सायन्स, कल्याण) | structural and electrical properties of nano structured CdTe thin Films. |
| • श्री. दीपक साबळे-सोनांबेकर, (प्रमुख, इकॉनॉमिक्स विभाग, जोशी-बेडेकर कॉलेज, ठाणे) | • An Affordable Mechanism for the Indian educational institutions: A "Chalk-dust on duster" Remover machine. |
| • नेहा देशपांडे (विद्यार्थीनिही, डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, पुणे | • Auto Doctor |
| • श्री. जोगी सिंग मुंडे आणि प्रतीक वाघ, विद्यार्थी, वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे.) | • Electronic security system using Biometrics |
| • प्राप्ती चंदनशिवे (विद्यार्थिनी वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.) | • Wearable electronics |

डॉ. व्ही. एच. पाटणकर यांनी तज्ज्ञ म्हणून या अधिवेशनाचे कामकाज पाहिले. परिषदेस विविध संस्थेतून तज्ज्ञ, संशोधक, उद्योजक, विद्यार्थी उपस्थित होते. सदर परिषद बाजीराव पेशवे सभागृह येथे पार पडली.

परिषदेची सांगता संघटन सचिव प्रा. कीर्ती आगाशे यांच्या आभारप्रदर्शनाने झाली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### डॉ. व्ही .एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे मातृभाषा दिन साजरा

दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ रोजी डॉ. व्ही .एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेच्या विद्यार्थ्यांनी खूपच रंगतदार कार्यक्रम सादर केला.

नव्या पिढीचे असूनही या कार्यक्रमातून सादर झालेली मराठी भाषेबद्दलची विद्यार्थ्यांची जाण, आपुलकी आणि प्रेम सर्वच प्रेक्षकांना अनपेक्षित, सुखद



आणि भारावून टाकणारे ठरले. अत्यंत नेटकी अशी रूपरेषा असलेल्या या कार्यक्रमात आपल्या समृद्ध मराठी भाषेतील ज्या वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती आहेत त्यांतील काही निवडक अशा कलाकृतींचे सादरीकरण, मराठी भाषेचा इतिहास, इंग्रजी शब्दांसाठी मराठी प्रतिशब्द शिवाजी महाराज आणि वीर सावरकरांचे मराठी भाषेसाठीचे योगदान, अशा विविध गोष्टींचा समावेश या कार्यक्रमात केला गेला.

मराठीतील संतवाणीने सुरू झालेल्या या कार्यक्रमात लोकसंगीत, लोकनृत्य, वक्तृत्व, नाटक, कविता, विनोद, भावगीत, ते नव्या पिढीची नवी मराठी

आवडती गाणी अशा विविधरंगी कार्यक्रमांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

कार्यक्रमाच्या शेवटी सादर केलेले मराठी अभिमान गीत आणि त्यासोबत दाखवली गेलेली अनेक प्रसिद्ध कर्तृत्ववान आणि महान मराठी माणसांची चित्रफित देखील खूपच प्रेक्षणीय होती. या सर्वच महान मराठी व्यक्तींचे मराठी दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी स्मरण करणे हे समर्पकच ठरले.

प्रसिद्ध कवी आणि गीतकार श्री. प्रवीण दवणे यांनी या कार्यक्रमाला अचानक सदिच्छा भेट देऊन कार्यक्रमाची रंगत अजूनच वाढवली. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि मातृभाषा दिनाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले.

या अतिशय सुंदर कार्यक्रमाचा शेवट करतानादेखील आमच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रांना आणि प्रेक्षकांना रोज थोडेतरी मराठी साहित्याचे वाचन करावे आणि त्यासाठी जवळच्या एकतरी ग्रंथालयाचे सभासद व्हावे असे आवाहन केले की जे आपल्या मातृभाषेच्या संवर्धनासाठी निश्चितच उपयोगी ठरेल.



डॉ. शीतल पाटील यांनी सर्व कलाकार विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## (DR. VN BRIMS) ब्रीम्सचे माजी विद्यार्थी संमेलन २०१५

वि. प्रां. म. च्या डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थे तर्फे दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ रोजी सायंकाळी संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. जुने चेहरे बऱ्याच दिवसांनी बऱ्याच वर्षांनी भेटल्याने जुन्या नव्या आठवणींनी, अभिप्रायांनी वातावरण भरून गेले होते या स्नेह संमेलनाला विशेष असे नाव देण्यात यावे असेही या वेळी ठरले आणि सर्वांकडून या नामकरणासाठी सूचना घेण्यात आल्या व नाव सुचविण्यास सांगण्यात आले.



संचालक डॉ. नितीन जोशी यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाला सुरुवात केली. माजी विद्यार्थी आणि संस्था यांचे नाते जुळलेले राहणे कसे महत्त्वाचे आहे याबद्दल थोडक्यात हितगुज करून त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना संस्थेच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले.

संस्थेतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी इंटरनेट तर्फे ऑनलाईन उपस्थित राहून माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला .

संस्थेच्या आजी विद्यार्थ्यांनी या संम्मेलनासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून माजी विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले माजी विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजनात्मक खेळ उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले

होते आणि सर्व माजी विद्यार्थ्यांनीदेखील या कार्यक्रमात आनंदाने आणि उत्साहाने सहभाग घेतला.

सुमारे ५८ माजी विद्यार्थी संमेलनाला उपस्थित होते आणि त्यामुळेच संस्थेच्या आजी विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांशी; अभ्यासक्रम आणि त्या अनुषंगाने त्यांचे कार्यक्षेत्रातील/व्यवसायातील अनुभव या संदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्याची संधी मिळाली. सर्वच माजी विद्यार्थ्यांनीदेखील या नवीन विद्यार्थ्यांशी मनमोकळी चर्चा केली आणि उन्हाळी प्रकल्प (Summer Placement ), रोजगार संधी , प्रशिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन अशा सर्वच बाबतीत सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.



आपल्या माजी विद्यार्थाची आपापल्या क्षेत्रांतील प्रगती आणि यश पाहून आम्हा सर्वानाही खूप आनंद झाला. एकूणच माजी विद्यार्थी संमेलन २०१५ आनंदाने साजरे झाले. माजी विद्यार्थ्यांचे असे हे स्नेह संमेलन; विद्यार्थी, शिक्षक, आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्याच रम्य गत स्मृतींना उजाळा देणारे ठरले.

●●●

**थोडसं वाचनीय**

## प्रेरणा स्त्रोत

कोणत्याही कंपनीमध्ये किंवा संस्थेमध्ये जर चुकीच्या व्यक्तीची वा चुकीच्या कृतीची स्तुती होत असेल तर चुकीचा पायंडा पडतो. योग्य कार्य करणाऱ्यांचे मनोधैर्य खची होत जाते. चांगले काम करून काय फायदा असा संशय कार्य संस्कृतीमध्ये पसरला तर मग हा व्हायरस सर्व सिस्टिमची वाट लावतो. तसेच स्तुतीचा वापर योग्य प्रमाणातच करावा लागतो. अन्यथा त्याचे विपरीत परिणाम दिसू लागतात. कारण स्तुती वा प्रशंसा एक अशी मिठाई आहे जी भल्याभल्यांना पचत नाही. काही जणांमध्ये अति आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो. यामुळे त्यांच्या कार्य पद्धतीवर विपरीत परिणाम होत जातो. या उलट व्यवस्थापक जेव्हा नियंत्रणाचा अतिरेकी वापर करतात तेव्हा मग कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरत जातो; तसेच जेव्हा वरिष्ठ कामापेक्षा स्वतःचे महत्त्व वढविण्यासाठी नियंत्रणाचा वापर करतात. तेव्हा मग कार्यप्रवीणते पेक्षा वरिष्ठांची भलामण करण्याची संस्कृती तयार होते.

संकलन

**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
ग्रंथालय-सहायक
वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

(पृष्ठ क्र. १५ वरून **'(कमी) बोलण्याची कला'**)

**कमी बोलण्याचे फायदे पहा :**

१) आपली निरीक्षण क्षमता वाढते.

२) दुसऱ्याचे ऐकल्यानंतर आपल्याकडे पुरेशी माहिती/ तथ्ये गोळा होतात. याचा उपयोग होतो.

३) दुसऱ्यांना बोलण्याची समान संधी मिळाल्याने त्यांना समाधान मिळते.

४) कमी बोलण्याने आपण आत्मसंवाद साधू शकतो.

अधीरवृत्ती कमी होते व स्वप्रतिमा संतुलित बनते. Look before you and think before you speak.

वाचक मित्रहो, वायफळ बडबड करण्यापेक्षा निरीक्षण व कृतीवर भर द्या. कारण कर्माचा ध्वनी शब्दापेक्षा मोठा असतो.!

**ज्योती सीताराम शिंदे**
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय,
वेळणेश्वर

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय)**

१९६२ साली या संस्थेला राजपत्रित करण्यात आले (Royal Charter). हेन्री ओल्डनबर्ग (Henry Oldenburg) यांची 'रॉयल सोसायटी'चे एक सचिव म्हणून नेमणूक झाली.




**हेन्री ओल्डनबर्ग (Henry Oldenburg)**



**लंडन येथील रॉयल सोसायटीचा दर्शनी भाग**

ओल्डनबर्ग हे मूळचे जर्मन नागरिक. ऑक्सफर्डमध्ये शिक्षण घेतल्यानंतर ते लंडनला स्थायिक झाले. राजघराणे किंवा सरदारांना शिकवण्याकरताही त्यांची नेमणूक झाली. त्यांचे मुख्य काम म्हणजे रॉयल सोसायटीमधील अभ्यासकांचा पत्रव्यवहार आणि सभांचे टिपण यांचा संग्रह करणे. ५ जानेवारी १६६५ ला पॅरिसमध्ये प्रकाशित झालेल्या Journal des Scavans ची प्रत ११ जानेवारी १६६५ ला ओल्डनबर्ग यांनी मिळविली आणि लगेचच रॉयल सोसायटीच्या सभेमध्ये ती सादर केली. संशोधकांच्या निरीक्षणांची टिपणे किती तत्परेतेने एकमेकांना उपलब्ध करून दिली जात होती याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. पॅरिसमधील या पहिल्या संशोधनपत्रिकेमध्ये आठ नोंदी होत्या. त्यांतील सात या विज्ञान आणि तत्त्वज्ञानावर छापल्या गेलेल्या पुस्तकांची शीर्षके माहिती होती. ही सगळी पत्रिकाच मुळी फक्त बारा पानांची आहे. ओल्डनबर्ग यांना सचिव म्हणून पत्रव्यवहाराच्या अनेक प्रती काढायला लागत. त्यापेक्षा पॅरिसच्या धर्तीवर आपल्यालाही एक संशोधनपत्रिका चालू करता येईल का, या विचारातून अवघ्या दोन महिन्यांत म्हणजे ६ मार्च १६६५ ला स्वतःच्याच संपादकत्वाखाली आणि छपाईचीही जबाबदारी घेऊन त्यांनी Philosophical Transaction चा पहिला अंक प्रकाशित केला. या अंकातही प्रामुख्याने छापल्या गेलेल्या पुस्तकांच्या



TRANSACTIONS:
GIVING SOME
ACCOMPT
OF THE PRESENT
Undertakings, Studies, and Labours
OF THE
INGENIOUS
IN MANY
CONSIDERABLE PARTS
OF THE
WORLD

Vol I.
For Anno 1665, and 1666.

**Philosophical Transaction या विज्ञान संशोधन पत्रिकेच्या पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ**

नोंदींचाच समावेश होता. या पहिल्या अंकात अकरा नोंदी होत्या आणि हा अंक सोळा पानांचा होता. संपादकीय लिहिण्याची सुरुवातही याच अंकापासून झाली. साहजिकच ओल्डनबर्ग यांनी या अंकाच्या संपादकीयात हा अंक काढण्यामागील कारणमीमांसा सादर केली हेती. या अंकाची दुसरी नोंद ही फार महत्त्वाची आहे. "An Account of the improvement of optic Glasses" या इटलीमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधकाच्या पुस्तकावरील ती टिप्पणी आहे. फ्रान्समधील पहिल्या अंकामध्येही याच पुस्तकाची नोंद घेऊन टिप्पणी छापली गेली होती. इंग्लंड हा एक दर्यावर्दी देश होता. त्यांच्या वसाहती स्थापन

करण्याकरता त्यांना त्यांच्या या कलेचा खूपच उपयोग झाला होता. रॉयल सोसायटीच्या पहिला अंकामध्ये 'A Narrative Concerning the Success of Pendulum-Watches at Sea for the Longitudes' या मेजर होम्स (Major Holmes) यांच्या 'रेखांश' काढण्याच्या पद्धतीवर माहिती देणारी टिप्पणी आहे. तसेच रॉबर्ट हूक यांचे 'गुरू'च्या संदर्भातील निरीक्षण, आणि बॉइल यांच्या An Experimental History of Cold या प्रकाशित होणाऱ्या पुस्तकाचीही माहिती देण्यात आली आहे.

पॅरिसपेक्षा लंडन येथून प्रकाशित होणाऱ्या Philosophical Transaction ची प्रगती जास्त वेगाने होत होती. १६९५ पर्यंत Philosophical Transaction ची पाने १६ वरून ३९ पर्यंत गेली होती. शिवाय याचा वाचकवर्गही वाढत होता. बरीच वर्षे ओल्डनबर्ग हे स्वतःच खर्च करून हा अंक प्रकाशित करीत होते. अर्थातच रॉयल सोसायटीने त्याची जबाबदारी पुढे उचलली. सुरुवातीची ही वर्षे अर्थातच बरीच अडचणीची होती. १६६५ चा इंग्लंडमधील प्लेग, आणि १६६६ ची लंडनमधील भीषण आग; या दोघांमुळे रॉयल सोसायटीला आपली जागा बदलावी लागत होती, आणि प्रकाशनांचा कालावधीही पुढे-मागे करावा लागत होता. १६६५ ते १६६७ या काळामध्ये अँग्लो-डच युद्ध चालू झाले. ओल्डनबर्ग हे मूळचे जर्मन. त्यांचा युरोपमधील सगळ्याच संशोधकांशी पत्रव्यवहार चालू असे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १६६७ साली ओल्डनबर्ग यांना लंडनच्या 'टॉवर ऑफ लंडन'मध्ये हेरगिरी करण्याच्या आरोपाखाली अटक करून ठेवण्यात आले. १६७७ साली त्यांचा मृत्यू झाला.

Philosophical Transaction चा व्याप दिवसे -दिवस वाढतच होता. विज्ञानाच्या नवनवीन शाखाही विकसित होत होत्या. १८८६ साली शेवटी या संशोधनपत्रिकेचे गणित, फिजिक्स इत्यादीकरता एक (A), आणि जैवशास्त्राकरता एक (B), असे दोन वेगळे भाग करण्यात आले. न्यूटन, लिस्टर, प्रिस्ली, हर्शेल, फॅरडे, ज्यूल, मॅक्सवेल अशा विज्ञानामध्ये मुलभूत सिद्धान्त अनेक मांडणाऱ्या शास्त्रज्ञांचे लेख यातून प्रकाशित झाले आहेत. ज्ञानाचा हा एक फार मोठा खजिनाच आहे. १६६५ पासून १९४३ पर्यंतचे सर्व अंक २०१० साली रॉयल सोसायटीने संगणकावर निःशुल्क उपलब्ध करून दिले आहेत.

आकडेवारीची करामत करून कुठलाही देश महासत्ता बनत नसतो. तसेच समाजाला जाती-पाती, शहरी-ग्रामीण अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागून राजकीय हेतू जरी साध्य होत असला, तरी 'कल्पकता' आणि 'सजनशीलता' विकसित होत नसते. पाश्चत्त्य देश आधुनिक विज्ञानामध्ये का प्रगत आहेत. असा प्रश्न नेहमीच विचारला जातो. Philosophical Transaction च्या प्रवासामध्ये त्या यशाची उत्तरे आहेत. यामध्ये कुठेही 'अस्मिता किंवा राष्ट्रीयत्वा' ची चर्चा नाही. 'कृतिशून्य', 'आत्मकेंद्रीत' व्यक्तीची किंवा समाजाची 'अस्मिता' फोल असते. अशी फोल 'अस्मिता'समाजाला अहंकारी, घटींगण आणि कमकूवत बनवते. अर्थातच राजकिय घराणेशहीला ती पोषकच असते. रॉयल सोसायटीच्या स्थापनेनंतर इंग्लंडमध्ये अनेक संस्था स्थापन झाल्या आणि आजही त्या कार्यरत आहेत. अशा संस्थांचे सभासदत्व आणि नेतृत्व हे कुठलीही तडजोड न करता प्रज्ञावंतांन कडेच जाते. कालांतराने या संस्था त्या समाज आणि देशाच्या संस्कृतीचा चेहरा बनतात. या संस्थांची ताकदच या देशांना महासत्ता बनवते. स्वातंत्र्योत्तर भारताचा या संदर्भातला इतिहास फारसा उत्साहवर्धक नाही.

'तंबाखूमुळे कॅन्सर होत नाही' असली निराधार विधाने करणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचे समर्थक यांच्यापासून आम्हांला वाचवा एवढीच विनंती सध्या परमेश्वराला करता येते.

**डॉ. विजय बेडेकर**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.